रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३१२
www.ramprahar.com

बुधवार, ३१ मे २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## शिवराज्याभिषेक सोहळ्यात पंतप्रधानांच्या संदेशाचे होणार प्रक्षेपण



**मुंबई** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तथा अखंड भारताचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल १ जूनपासून स्वराज्याची राजधानी ऐतिहासिक रायगड परिसरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोहळ्याचे उद्घाटन २ जून रोजी सकाळी ८.३० वाजता होणार आहे. या वेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संदेशाचे प्रक्षेपण केले जाणार आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, केंद्रीय संस्कृतीमंत्री जी. किशन रेड्डी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री उदय सामंत, रायगड विकास प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती तसेच इतर लोकप्रतिनिधी व मोठ्या संख्येने शिवप्रेमी उपस्थित राहणार आहेत.

अंतरंग

शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज/२

अर्ध्या किमतीत सोने देतो सांगून फसवणूक/५

चेन्नईचा आयपीएल विजेतेपदाचा 'पंच' ; चषकावर कोरले नाव/८

# शेतकरी, कामगारहिताला सरकारचे प्राधान्य

## ■ राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी (दि. ३०) झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यात आला आहे. त्याचबरोबर नवीन कामगार नियमांना मान्यता देण्यात आली. याशिवाय अन्य निर्णय घेण्यात आले.



**नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविणार**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचा आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. २०२३-२४च्या अर्थसंकल्पीय भाषणात घोषित केल्याप्रमाणे बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना राबविण्यात येईल. या योजनेतून प्रति वर्ष सहा हजार रुपये लाभ (दर चार महिन्यांनी दोन हजार रुपये असे वार्षिक समान तीन हप्त्यांत) पात्र लाभार्थींच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

**अवघ्या एक रुपयात मिळणार पीक विमा योजनेचा लाभ**

राज्यात सर्व समावेशक पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यानुसार शेतकऱ्यांना केवळ एक रुपया भरून पीक विमा योजनेचा लाभ देण्यात येईल.

याशिवाय राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशनला मुदतवाढ देण्याचा तसेच राज्यभर व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**नवीन कामगार नियमांना मान्यता**

केंद्र शासनाने सर्व २९ कामगार कायदे एकत्र करून चार कामगार संहिता तयार केल्या असून व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामाची स्थिती या चौथ्या संहितेस राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. नवीन कामगार नियमांना मान्यता दिल्याने लाखो कामगारांचे हित जपण्यात आले आहे.

**महिलांसाठी आई पर्यटन धोरण**

महिलांना पर्यटन व्यवसायात अधिकाधिक वाव मिळावा आणि त्यांचे सक्षमीकरण व्हावे म्हणून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत आई हे महिला केंद्रित पर्यटन धोरण राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे काही पर्यटनस्थळी महिला बाईक-टॅक्सी सेवा सुरू करण्याससुद्धा मान्यता देण्यात आली.

**नवे माहिती तंत्रज्ञान धोरण**

राज्याला माहिती तंत्रज्ञानात देशात आघाडीवर नेणाऱ्या नवीन माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. धोरणामध्ये या क्षेत्रात ९५ हजार कोटींची गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## काँग्रेस खासदार सुरेश धानोरकर यांचे निधन



**चंद्रपूर : प्रतिनिधी**

काँग्रेसचे महाराष्ट्रातील एकमेव खासदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांचे मंगळवारी (दि. ३०) उपचारादरम्यान निधन झाले. ते ४८ वर्षांचे होते. मागील तीन दिवसांपासून त्यांच्यावर दिल्लीतील मेदांता रुग्णालयात उपचार सुरू होते. अखेर त्यांची प्राणज्योत मालवली.

चंद्रपूर वरोरा लोकसभा मतदारसंघाचे खासदार बाळू धानोरकर यांच्यावर किडनीसंबंधी आजारामुळे नागपूर येथे उपचार सुरू होते. प्रकृती खालावत गेल्याने दोन दिवसांपूर्वी त्यांना एअर एम्ब्युलन्सने दिल्ली येथे हलवण्यात आले. तेथे ते व्हेंटिलेटरवर होते. रात्री सव्वादोनच्या सुमारास त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी आमदार प्रतिभा, दोन मुले, आई, भाऊ, बहीण व बराच मोठा परिवार आहे.

चार दिवसांपूर्वीच खासदार धानोरकर यांचे वडील नारायण धानोरकर यांचे निधन झाले होते. वडिलांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी ते नागपुरात उपचार घेत होते. पिता-पुत्राच्या लागोपाठ मृत्यूमुळे धानोरकर कुटुंबीयांवर दुःखाचे डोंगर कोसळले आहेत.

खासदार धानोरकर यांच्यावर बुधवारी (दि. ३१) वणी-वरोरा बायपास मार्ग येथील मोक्षधाम येथे सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडून श्रद्धांजली

**मुंबई** : खासदार सुरेश उर्फ बाळू धानोरकर यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली व्यक्त केली आहे. धानोरकरांच्या निधनाने एक तरुण, तडफदार आणि लढवय्या लोकप्रतिनिधी आपण गमावला आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती प्रदान करो तसेच त्यांच्या कुटुंबीयांना या अतीव दुःखातून सावरण्यासाठी बळ देवो हीच प्रार्थना, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे, तर महाराष्ट्राने एक तरुण राजकारणी गमावला आहे. त्यांच्या निधनाने लोकांच्या प्रश्नांची जाण असणारे व्यक्तिमत्त्व हरपले आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्र्यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडून मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी

## गणेशोत्सवापर्यंत सिंगल लेन पूर्ण होणार



**झाराप (सिंधुदुर्ग) : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गाचे काम जलद गतीने सुरू असून येत्या गणेशोत्सवापर्यंत सिंगल लेन आणि डिसेंबर २०२३पर्यंत रस्ता पूर्ण होणार आहे. यामुळे गणेशोत्सवाला जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर होईल, असा विश्वास राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री तथा पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी (दि. ३०) सिंधुदुर्ग दौऱ्यात व्यक्त केला.

मंत्री चव्हाण यांनी सकाळी झाराप येथून मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी करण्यास सुरुवात केली. त्यांच्यासमवेत प्रांताधिकारी ऐश्वर्या काळुसे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अजयकुमार सर्वगोड, माजी आमदार राजन तेली, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष अतुल काळसेकर, प्रभाकर सावंत आदी उपस्थित होते. या पाहणीनंतर मंत्रीमहोदय माध्यमांशी बोलत होते. आपल्या दौऱ्यात त्यांनी ग्रामस्थांशीही संवाद साधला.

## भिवंडीत अवकाळी पावसाने दाणादाण!

**भिवंडी : प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात मंगळवारी (दि. ३०) वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. या वेळी सोसाट्याच्या वाऱ्याने अनेक घरांचे पत्रे उडाले, तर झाडे उन्मळून १० ते १२ जण जखमी झाल्याचे वृत्त आहे.

या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका भिवंडी तालुक्यातील पडघा-बोरिवली भागाला बसला. या भागातील अनेक घरांचे छप्पर उडून नागरिकांचा संसार उघड्यावर आला आहे. शेतीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, अनेक ठिकाणी विजेचे खांब पडल्याने परिसराचा वीजपुरवठा खंडित झाला होता.

### निवडक

**स्वच्छ मुख अभियानाचा सचिन तेंडुलकर सदिच्छादूत**

**मुंबई :** राज्य सरकारकडून भारताचा माजी दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरची महाराष्ट्राच्या स्वच्छ मुख अभियानाचा सदिच्छादूत (ब्रॅण्ड ॲम्बेसेडर) म्हणून निवड करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि. ३०) सचिनने या अभियानाच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

**रिअल इस्टेट एजंट्सच्या परीक्षेचा ९६ टक्के निकाल**

**मुंबई** : स्थावर संपदा क्षेत्रातील म्हणजेच रिअल इस्टेट एजंट्ससाठी घेण्यात आलेल्या पहिल्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत ४२३पैकी ४०५ उमेदवार यशस्वी झाले असून ९६ टक्के निकाल लागला आहे.

## 'संपूर्ण ठाकरे गटच असंतुष्ट'

**मुंबई : प्रतिनिधी**

संपूर्ण ठाकरे गटच तीन ते चार लोकांमुळे अस्वस्थ आहे, असे भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दै. सामनाच्या अग्रलेखात शिवसेना आमदार, खासदारांसह भाजपवर टीका करण्यात आली आहे. त्याला उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रत्युत्तर देत सूचक वक्तव्य केले आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, संपूर्ण ठाकरे गटच अस्वस्थ आहे. तिकडे जेवढी अस्वस्थता आणि असंतुष्टता आहे ती तीन-चार लोकांमुळे आहे. त्या संदर्भात मी बोलण्याऐवजी तुम्हाला भविष्यात कळेल.

कोर्टाच्या निकालाबाबत विचारले असता उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, शिवसेना किंवा राष्ट्रवादी काँग्रेस असेल त्यांना माहीत आहे की पोपट मेला आहे, पण त्यांच्या कार्यकर्त्यांना निराश वाटू नये म्हणून अशा प्रकारची वक्तव्ये केली जात आहेत, मात्र अशा प्रकारच्या वक्तव्यांनी न्यायालयाचा कुठलाही निर्णय बदलत नसतो.

शिवसेनेने १९ जून रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचा वर्धापन दिन साजरा करण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. दुसरीकडे ठाकरे गट वेगळा वर्धापन दिन साजरा करणार आहे. यावरून प्रश्न विचारला असता उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी, प्रत्येक पक्षाला आपला वर्धापन दिन साजरा करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे त्यांनी ठरवले असेल. त्याबद्दल काय बोलणार, असे मत व्यक्त केले.

## अमृत सरोवर अभियानांतर्गत रायगडातील १५३ तलावांचे संवर्धन

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या अमृत सरोवर अभियान अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यातील १५३ तलावांमधील गाळ काढणे, सुशोभीकरण करणे, बळकटीकरण किंवा पुनर्जीवन अशी कामे पूर्ण करण्यात आली आहेत, तर २५ तलावांचे संवर्धन करण्याची कामे प्रगतिपथावर आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

सरोवर संवर्धन अभियान अंतर्गत एक एकर क्षेत्राचे नवीन तलाव निर्मिती करणे तसेच एक एकर क्षेत्रात अस्तित्त्वात असणाऱ्या तलावातील गाळ काढणे, सुशोभीकरण करणे, बळकटीकरण किंवा पुनर्जीवन करणे यासह तलाव परिसरात



वृक्ष लागवड, शौचालय व्यवस्था ही कामे करण्यात आली आहेत.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून तालुका स्तरावरून अस्तित्वात असणाऱ्या १७८ तलावांची अमृत सरोवर पोर्टलवर नोंद करण्यात आली असून ग्रामस्थांच्या सहभागातून ग्रामपंचायत १५व्या वित्त आयोग माध्यमातून आणि शासनाच्या विविध योजना तसेच कंपन्यांच्या विकासनिधीतून तलावांची कामे हाती घेण्यात आली होती. यासाठी लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, महिला बचत गट, नागरिक यांनी तलाव संवर्धन अभियानात आपला सक्रिय सहभाग नोंदवला होता. या सर्वांच्या सहकार्याने जिल्ह्यातील १५३ तलावांचे संवर्धन करण्यात जिल्हा परिषद प्रशासनाला यश मिळाले असून उर्वरित २५ तलावांचे संवर्धन करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

अमृत सरोवर अभियानांतर्गत अलिबाग तालुक्यातील ११ तलावांचे संवर्धन करण्यात आले, तर कर्जत १०, खालापूर २०, महाड ११, माणगाव १४, म्हसळा ७, मुरुड ९, पनवेल १३, पेण ८, पोलादपूर १०, रोहा १३, श्रीवर्धन ५, सुधागड १०, तळा २, उरण १० तलावांचे संवर्धन करण्यात आले आहे.

## कामोठ्यात साकारणार कुस्तीचा आखाडा

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल क्षेत्रातील कुस्तीपटूंसाठी आनंदाची बातमी असून महापालिकेमार्फत कामोठ्यामध्ये कुस्तीचा आखाडा तयार करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी (दि. ३०) महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह जाऊन पाहणी केली.

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका क्षेत्रातील खेळाडूंसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्या अंतर्गत कामोठे सेक्टर ८ प्लॉट २५ ए येथे महापालिकेमार्फत कुस्तीचा आखाडा तयार करण्यात येणार आहे.

पाहणीवेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह माजी नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, भाजप ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, प्रदीप भगत, संतोष म्हात्रे, युवा नेते हॅप्पी सिंग, महापालिकेचे अधिकारी राजेश करडिले, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## रायगडात विशेष ऑल आउट ऑपरेशन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता पोलिसांनी सोमवारी (दि. २९) जिल्ह्यात विशेष ऑलआउट ऑपरेशन राबविले. या ऑपरेशनमध्ये अवैध दारू विक्रेते व जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

छत्रपती शवाजी महाराजांचा ३५०वा शिवराज्याभिषेक सोहळा किल्ले रायगड येथे साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर विशेष ऑल आउट ऑपरेशन राबविण्यात आले. या ऑपरेशनमध्ये ३३ जणांवर कारवाई करण्यात आलेली. जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये एकूण ३३ गुन्हे दाखल करण्यात आले. त्याचप्रमाणे नऊ जुगार ठिकाणांवर छापा टाकून एकूण नऊ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याशिवाय संशयित वाहनांची तपासणी केली गेली.

(सविस्तर वृत्त पान २ वर...)



# औद्योगिक कॉरिडॉरच्या विकासावर भर -मुख्यमंत्री

## राष्ट्रीय कॉरिडॉर विकास आणि अंमलबजावणी शिखर संनियंत्रण समितीची बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील औद्योगिक कॉरिडॉर्सच्या विकासाला प्राधान्य दिले असून तेथील विकासकामे गतीने व्हावीत यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि. ३०) येथे सांगितले. केंद्र सरकारने देशभरात विविध औद्योगिक टाऊनशिपमध्ये उद्योग समुहासाठी २३९ प्लॉट वितरित केले होते. त्यातील महाराष्ट्रात शेंद्रा-बिडकीन येथे २०० प्लॉटचे वितरण केल्याची माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. त्यावर केंद्रीय समितीने महाराष्ट्राच्या उद्योगांना आकर्षित करण्याच्या धोरण आणि कार्यप्रणालीचे कौतुक केले.



राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉरच्या विकास आणि अंमलबजावणीबाबत शिखर संनियंत्रण समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री शिंदे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. या बैठकीस दिल्लीहून अर्थमंत्री निर्मला सीतारामन, वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, केंद्रीय बंदरे, जहाज वाहतूक, जलमार्ग आणि आयुष मंत्री सर्बानंद सोनोवाल तर मंत्रालयातून मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव विकास खारगे, प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक सुरेश काकाणी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, सध्या ७७ प्लॉटवर विकास कामे सुरू असून २७ उद्योगांनी प्रत्यक्ष उत्पादन सुरू केले आहे.

येणाऱ्या आणखी ५० उद्योगांचे उत्पादन सुरू होईल, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. याठिकाणी वीज पुरवठ्याचा परवाना मिळाला असून काही महिन्यात कमी दरात उद्योगांना वीज दिली जाणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

औरंगाबाद-पैठण रस्त्याच्या रूंदीकरणाचे काम वेळेवर पूर्ण करावे, शिवाय औरंगाबाद-पुणे हरित महामार्गाची अधिसूचना निघाली असून यासाठी भूसंपादन लवकर व्हावे, या मार्गावर रेल्वे लाईनसाठी अतिरिक्त जागेचे भूसंपादन केल्यास दोन्ही प्रकल्पाच्या विकासाला गती येईल, करमाड (जि. औरंगाबाद) येथील रेल्वेस्थानकांमध्ये रेल्वे सायडिंग व मालाची चढउतार करण्याची व्यवस्था करावी, या मागण्या मुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्राकडे केल्या.

सद्य स्थितीत महाराष्ट्रातून दिल्ली-मुंबई, बंगळुरू-मुंबई आणि दिल्ली-नागपूर हे तीन औद्योगिक कॉरिडॉर आहेत. यामध्ये दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत शेंद्रा-बिडकीन औद्योगिक नगर- ऑरिक सिटी, दिघी पोर्ट औद्योगिक नगर (जि. रायगड) असे प्रकल्प सुरू आहेत.

दिल्ली-नागपूर आणि बंगळुरू-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत औद्योगिक नगरी साठी सुयोग्य जागांचा शोध सुरू आहे. या औद्योगिक केंद्रांचा विकास करण्यासाठी केंद्र सरकार ४९ टक्के निधी देणार आहे.

केंद्र सरकारकडे प्रलंबित असलेल्या महाराष्ट्राच्या प्रस्तावांमध्ये लक्ष घालून ते मंजूर करण्यात येतील, अशी हमी वाणिज्यमंत्री गोयल यांनी दिली. केंद्रीय सचिव सुमिता दावरा यांनी देशभरातील सुरू असलेले प्रकल्प आणि भूसंपादन याबाबतची माहिती सादरीकरणातून दिली.

### रायगडातही विविध प्रकल्प

*दिघी येथे दोन हजार ४५० हेक्टरवर ही औद्योगिक नगरी उभी राहत असून यासाठी ९० टक्क्यांपर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून उर्वरित भूसंपादन सुरू आहे. यामध्ये दोन हजार २०५ हेक्टर जमिनीचे भूसंपादन पूर्ण झाले आहे. केंद्र शासनाकडून या प्रकल्पाला त्वरित मंजुरी मिळावी अशी मागणी मुख्यमंत्री शिंदे यांनी केली, तसेच दिघी पोर्ट ते रोहा रेल्वेस्थानकापर्यंत रेल्वेलाईन प्रकल्पाची सुरुवात करावी, नियोजित प्रकल्पाच्या स्थानकापासून कोलाड रेल्वे स्थानकापर्यंत रेल्वे लाईन जोडणी मिळावी. या क्षेत्रातून जाणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण, चौपदरीकरण व्हावे. या प्रकल्पातील बोंडशेत व कुंभार्ते या गावांना पर्यावरण संवेदनशील भागामधून वगळण्याच्या प्रस्तावाला मान्यता मिळावी, अशी मागणीही त्यांनी केली.*

# अनधिकृत बांगलादेशी फेरीवाल्यांवर कडक कारवाई करावी

## मंत्री मंगलप्रभात लोढांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

आरे स्टॉलसमोर अनधिकृत बांगलादेशी फेरीवाल्यांच्या होणाऱ्या त्रासामुळे नागरिकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे हे लक्षात घेता अनधिकृत बांग्लादेशी फेरीवाल्यांवर तत्काळ कडक कारवाई करण्याचे निर्देश महिला व बालविकासमंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी प्रशासनाला दिले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्रीशक्ती समाधान शिबीर कार्यक्रमात कुर्ला (पश्चिम) एल वॉर्ड येथे आज ६८९ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १३० तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात आले आहे. उर्वरित तक्रारीदेखील वेळेत निराकरण करून समस्या प्राधान्याने सोडविण्याचे निर्देश मंत्री लोढा यांनी दिले. या वेळी स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

या वेळी महिलांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली तसेच बँका आणि महिला आर्थिक विकास महामंडळ आणि विविध विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलमध्ये शासनाच्या विविध विभागांकडून महिलांकरिता राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती महिलांना देण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्री शक्ती समाधान शिबीर कार्यक्रम आयोजित केला आहे. हा उपक्रम ३१ मे २०२३ पर्यंत दुपारी ३ ते ५.३० वाजता सुरू राहणार आहे. या उपक्रमात महिलांना तक्रारीसाठी प्रत्येक वॉर्डमध्ये ऑनलाईन अर्जही करता येणार आहेत. अधिक माहितीसाठी व अर्ज भरण्यासाठी https://forms.gle/7GzCS-CLYsj38amq9 या लिंकवर जाऊन माहिती भरता येणार आहे.

# रायगड जिल्हा पोलिसांचे विशेष ऑल आउट ऑपरेशन

### अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कारवाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

छत्रपती श्री शिवाजी महाराज यांचा ३५०वा शिवराज्याभिषेक सोहळा शुक्रवारी (दि. २) किल्ले रायगड येथे साजरा होणार आहे. या अनुषंगाने रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता पोलिसांनी सोमवारी (दि. २९) विशेष ऑल आउट ऑपरेशन राबविले. या ऑपरेशनमध्ये अवैध दारू विक्रेते व जुगार खेळणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे विशेष ऑपरेशन राबविण्यात आले. या ऑपरेशनमध्ये जिल्हा पोलीस दलातील ८६ पोलीस अधिकारी व ३७२ अंमलदार सहभागी झाले होते. ३३ जणांवर महाराष्ट्र दारुबंदी कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण ३३ गुन्हे दाखल करण्यात आले, तसेच नऊ जुगार ठिकाणांवर छापा टाकून नऊ आरोपींना ताब्यात घेतले आहे.



११३४ संशयित वाहनांची तपासणी करुन त्यांतील ३९१ वाहानांवर कारवाई करुन दोन लाख २३ हजार ७०० रुपये दंड वसुल करण्यात आला. ऑल आउट ऑपरेशनमध्ये ५० वॉरंट व १८५ समन्स बजावण्यात आले. रायगड जिल्हा पोलीस अभिलेखावरील १६३ आरोपींची चौकशी करण्यात आली.

## पोलीस संदीपान सोनावने यांना निरोप

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीपान सोनावने यांची बदली झाल्याने कर्मचाऱ्यांनी त्यांना भावपूर्ण निरोप दिला.

या वेळी कर्मचारी, अधिकारी कमी असले तरी नागरिकांची सेवा आपण सर्वांनी परिपूर्ण केली असल्याचे सोनावने यांनी सांगितले. या वेळी एएसआय मल्हारी मढवी, महिला पोलीस नाईक स्वप्नाली पवार, शिपाई मल्हारी तोरसल्ले, प्रकाश कदम यांनाही निरोप देण्यात आला. पीएसआय सुर्यवंशी, योगिता बांडे, एएसआय राजेंद्र म्हात्रे, सूर्यकांत जाधव आदी उपस्थित होते.

# देवपूर येथे शासन आपल्या दारी कार्यक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

सामान्य माणसाच्या दारात शासन जाऊन शासनाच्या योजना, विविध उपक्रमांचा लाभ सर्वसामान्यांना मिळावा हाच मुख्य उद्देश असल्याचे मत मंडळ अधिकारी सुरेश राठोड यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील देवपूर येथे कोंढवी विभागाच्या वतीने शासन आपल्या दारी अभियान कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, कृषी सहाय्यक मनोज जाधव, तलाठी रितु सुदर्शने, जया फुलवर, ग्रामसेवक शिल्पा कोंढाळकर, कृषी सहाय्यक महेश कदम,



अनिल डासाळकर, प्रसाद भोकरे, माजी उपसरपंच जगदीश महाडिक, महादेव शिंदे, सत्यवान महाडिक, सोपान पवार, गणपत महाडिक, संजय पवार, नामदेव येरुणकर, प्रकाश येरुणकर, तुकाराम मोरे, पोलीस पाटील उषा येरूणकर, रेशमा पवार ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी, कोतवाल, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमात कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी कृषी विभागातील मग्रारोहयो अंतर्गत फळबाग लागवड योजना, शेतकरी अपघात विमा, पिक विमा, यांत्रिकीकरण यांची माहिती दिली. कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी भात लागवड, फळबाग लागवड व जलकुंड, बीजप्रक्रिया या विषयी माहिती दिली.

कृषी विभागाच्या वतीने बियाणे वाटप, मग्रारोहयो फळबाग लागवड अर्ज स्वीकारले, महसूल विभागाने सातबारा वाटप, वारस नोंद अर्ज, नवीन मतदार नोंदणी, पी एम किसान ई-केवायसीबाबत माहिती दिली. प्रस्तावना कृषी सहायक मनोज जाधव तर आभार प्रदर्शन जगदीश महाडिक यांनी केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कारांचे आज होणार वितरण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून या वर्षापासून ग्रामपंचायत स्तरावर सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या दोन कर्तबगार महिलांचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देवून सन्मान करण्याचा निर्णय महिला व बालविकास विभागाने घेतला आहे. हे पुरस्कार वितरण बुधवारी (दि. ३१) होणार आहे.

या पुरस्कारासाठी राज्यातील एकूण २७ हजार ८९७ ग्रामपंचायतीमध्ये एक लाख ३९ हजार ४८५ महिलांनी पुरस्कार मिळण्यासाठी अर्ज सादर केले होते. शासन निर्णयानुसार गठीत समितीच्या माध्यमातून छाननी करुन राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये सुमारे ५५ हजार ७९४ महिलांना सन्मानपत्र, सन्मानचिन्हे, शाल व श्रीफळ आणि रोख रक्कम ५०० रु. देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीदिनी बुधवारी त्यांचे जन्मगाव श्रीक्षेत्र चौंडी, ता. जामखेड, अहमदनगर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जयंती सोहळा होणार आहे. या सोहळ्यात अहमदनगर जिल्ह्यातील १० ग्रामपंचायतींमधील पुरस्कार विजेत्या महिलांचा सन्मान होणार आहे, तसेच ठाणे व पालघर जिल्ह्यातील प्रत्येकी १५ ग्रामपंचायतींमधील ६० पुरस्कार विजेत्या महिलांचा सन्मान सोहळा सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे होणार आहे.

# रोह्यात नागरिकांना विविध दाखल्यांचे वाटप

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तहसील कार्यालय व सुराज्य सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे आयोजित शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत नागरिकांना दाखल्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन तहसीलदार किशोर देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी निवासी नायब तहसीलदार राजेश थोरे, मंडळ अधिकारी रोहा भरत सावंत, तलाठी रमेश झावरे, तलाठी कविता म्हशेलकर, तलाठी प्राजक्ता मेकडे, तलाठी तेजश्री मोरे, विशाल चोरगे, सुप्रिया टेमकर, पुजा नाईक, सुराज्य सामाजिक प्रतिष्ठानचे रोशन चाफेकर, प्रिया जंगम, वैभव कुलकर्णी, राहुल पोकळे, विनीत वाकडे आदी उपस्थित होते.

नव्या शैक्षणिक वर्षासाठी विविध दाखल्यांची आवश्यकता असते. नागरिकांना हे दाखले मिळवण्यासाठी तहसील कार्यालयाला सातत्याने जावे लागत आहे. या दृष्टीकोनातून शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत तहसीलदार किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कागदपत्रांची पूर्तता करीत विविध दाखले देण्याचे उपक्रम राबविण्यात आले. उत्पन्नाचा दाखला, डोमिसाईल, नॉन क्रिमीलेअर, ईडब्ल्यूएस, जातीचा दाखला, ४/२चा दाखला, नवीन मतदार नोंदणी, दुय्यम शिधापत्रिका, फूड लायसन्स व उद्यम आधार आदी दाखले देण्यात आले. या उपक्रमाबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त करीत शासनाचे आभार मानले आहे.

# मुरूड समुद्र किनाऱ्यावरील दगड चोरणारे मोकाटच!

## जनआंदोलन छेडण्याचा भाजपचा इशारा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड समुद्रकिनाऱ्यावरील ९० ते १०० ब्रास दगड मार्च महिन्यात चोरीला गेले होते. या दगडांची किंमत सुमारे तीन लाख ५० हजार रुपये इतकी आहे. या चोरीची तक्रार नगर परिषदेने पोलीस ठाण्यात केली, मात्र त्यानंतर कोणत्याही प्रकारची कार्यवाही अद्याप झालेली नाही. त्यामुळे याबाबत तातडीने तपास सुरू करून आरोपींना अटक करा, अन्यथा जनआंदोलन छेडू, असा इशारा मुरूडमधील भाजपचे ज्येष्ठ नेते आण्णा कंधारे यांनी दिला आहे.

समुद्रकिनारी सीसीटीव्ही असतानासुद्धा चोर सापडत नसेल तर हे हास्यास्पद आहे. सीसीटीव्ही,पर्यटक समुद्रात बुडू नये म्हणून टेहळणी केंद्र, सर्व यंत्रणा असताना चोर पकडला का जात नाही? असा सवाल सुद्धा त्यांनी उपस्थित केला आहे.

आज या चोरीला तीन महिने झाले, तरी चोर पकडण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी का पाठपुरावा केला नाही, असा सवालही त्यांनी केला.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

**अलिबाग : प्रतिनिधी**

किल्ले रायगडावर ३५०वा शिवराज्याभिषेक सोहळा २ ते ६ जून रोजी मोठ्या दिमाखात साजरा होणार आहे. हा सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. या सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे, अशी माहिती रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी मंगळवारी (दि. ३०) पत्रकार परिषदेत दिली. रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील या वेळी उपस्थित होते.



२ जून रोजी तिथीप्रमाणे राज्याभिषेक, तर ६ जून रोजी तारखेप्रमाणे राज्याभिषेक साजरा होत आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तथा आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा हा ३५०वा शिवराज्याभिषेक सोहळा आहे. या सोहळ्यासाठी विविध शासकीय विभागांच्या ३३ समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांच्या वतीने त्यांच्यावर सोपविण्यात आलेले कार्य याचे नियोजन करण्यात आले आहे. २ जून रोजी होणाऱ्या शिवराज्याभिषेकाला शासनाचे प्रतिनिधी म्हणून केंद्र आणि राज्य शासनाचे प्रतिनिधी उपस्थित राहाणार आहेत. २ जून रोजी तिथीप्रमाणे राज्याभिषेक, तर ६ जून रोजी तारखेप्रमाणे राज्याभिषेक सोहळा होणार आहे. या दोन्ही दिवशी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी केली जाणार आहे.

२ व ६ जून रोजी राज्याभिषेक सोहळा असला तरी २ ते ७ जून या कालवधीत विविध कार्यक्रम सदर केले जाणार आहेत. २४ आरोग्य केंद्र उभारण्यात येणार आहेत. तेथे डॉक्टर व नर्स असतील. गडावर पाच लक्ष, तर खाली १० लक्ष लिटर पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. मोफत भोजन देण्यात येणार आहे. स्नानगृह, स्वच्छतागृह उभारणात येणार आहेत. रायगडवर कचरा साठू नये म्हणून ५०० कचराकुंड्या ठेवण्यात येणार आहेत. सहा हजार कार, तीन हजार मोटरसायकल पार्क होतील अशी पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. तीन हेलिपॅड तयार करण्यात आली आहेत. पार्किंगपासून गडापर्यंत जाण्यासाठी मोफत बस सुविधा देण्यात येणार आहे. १०९ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. १००० मार्गदर्शक फलक लावण्यात आले आहे. १५० वॉकीटॉकी असतील. १७० पोलीस अधिकारी, १२०० अमलदर, २७६ वाहतूक पोलीस, ३५० होमगार्ड, एसआरपीची एक कंपनी असा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

**३५०वा शिवराज्याभिषेक सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. चांगले नियोजन केले आहे. शिवभक्तांनी आम्हाला सहकार्य करायला हवे. प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या सूचनांचे शिवभक्तांनी पालन करावे. आजारी व्यक्तींनी गडावर जाण्याचे टाळावे. गडावर स्वच्छता राखावी.**

**-डॉ. योगेश म्हसे, जिल्हाधिकारी**

### दुखवटा

#### नरहरी पाटील



**खोपोली** : शहरातील स्वामी समर्थ भक्त नरहरी बाळकृष्ण पाटील यांचे वयाच्या ७७व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. नरहरी पाटील यांनी खालापुरात घरामध्ये मठाची स्थापना करीत स्वामी समर्थांची सेवा केली. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दि. नरहरी पाटील यांनी भव्य मठ उभारणीचे काम त्यांनी हाती घेतले होते. मठाचे काम पूर्ण करण्याचा निर्धार स्वामी सेवकांनी केला आहे.

#### शालुबाई पाटील



**पनवेल** : चिंचवली येथील शालुबाई सीताराम पाटील यांचे वयाच्या ९०व्या वर्षी सोमवारी (दि. २२) निधन झाले. शालुबाई निधनाची बातमी मिलताच माजी खासदार रामशेठ ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पाटील कुटुबांची भेट घेऊन सांत्वन केले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कै. शालुबाई पाटील यांचा दशक्रिया विधी बुधवारी (दि. ३१) श्री क्षेत्र नाशिक येथे होणार असून उत्तरकार्य रविवारी (दि. ४) चिंचवली येथील राहत्या घरी होणार आहे.

# संभाव्य आपत्तीसाठी प्रशासन सज्ज

## पनवेलमधील दरडग्रस्त व पूरग्रस्त गावांकरिता आराखडा तयार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील सात गावे ही पूरग्रस्त गावे असून तीन गावे दरडग्रस्त आहेत. ही परस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आपत्तीवर मात करण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे.

पनवेलमध्ये सरासरी दरवर्षी दोन हजार ८२४ मिलीमीटर पाऊस पडतो, मात्र गेली काही वर्षे पावसाळ्यात सातत्याने महापूर येऊन काही गावांमध्ये नदीचे पाणी शिरून घरातील सामानांचे मोठे नुकसान होत असते. तर डोंगराच्या पायथ्याशी घरे असलेल्या कुटुंबांना दरडीचा धोका पावसाळ्यात निर्माण होत असल्याचे समोर आले आहे.

पनवेल तालुका प्रशासनाने तालुक्यातील संभाव्य आपत्ती लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार केला आहे. अतिवृष्टीमुळे सात गावांमध्ये पाणी शिरून नुकसान होणाऱ्या गावांमध्ये आपटा, चिपळे, करंजाडे, पारगाव अथवा पारगाव डुंगी, दापोली भंगारपाडा, पालीदेवद अथवा शीलोत्तर रायचूर, भिंगारीपाडा काळुंद्रे यांचा समावेश आहे. तर दरड ग्रस्त गावांमध्ये चिंचवाडी धोदानी, सतीची वाडी मालडुंगे आणि धोदाणी या गावांचा समावेश आहे. पारगाव येथे सिडकोने केलेल्या भरावामुळे ग्रामस्थांच्या घरात पाणी जाऊन नुकसान होते. स्थलांतरासाठी आपटा गावातील नागरिकांसाठी राजीप शाळा आपटा, करंजाडे, पारगाव डुंगी आणि दापोली भंगारपाडा यांच्यासाठी राजीप शाळा सिडको करंजाडे, भिंगारीपाडा काळुंद्रे यांच्यासाठी



राजीप प्राथमिक शाळा काळुंद्रे येथे पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

खाडी किनाऱ्यावरील वडघर, करंजाडे, कच्छी मोहल्ला पनवेल ही गावे आहेत. त्यांना अनुक्रमे स्थलांतरासाठी प्राथमिक शाळा वडघर पुनर्वसन मराठी शि. चिंचपाडा, राजीप शाळा सिडको करंजाडे, आणि पीर कमरअली शहा मनपा शाळा क्र. ६ येथे पर्यायी ठिकाणी ठेवण्यात आले आहेत. पूरग्रस्त दरडग्रस्त आणि खाडीकिनाऱ्यावरील गावांमध्ये पावसामुळे जवळपास ६०० हून अधिक कुटुंबे व साडेपाच हजार नागरिक बाधित होत असल्याची आकडेवारी देण्यात आली आहे. तहसील विभागातर्फे त्यांच्या स्थलांतरासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.

> **पनवेलमध्ये तालुका आपत्ती व्यवस्थापना अंतर्गत बैठकी घेण्यात आले आहेत. व आराखडा तयार करण्यात आला आहे. पूरग्रस्त गावासंदर्भात सिडकोला कळवलेले आहे. दरडग्रस्त तीन गावे ही कमी धोका असलेली आहेत. एक जून पासून नियंत्रण कक्ष सुरू होत आहे.**
>
> **–विजय तळेकर, तहसीलदार, पनवेल**

# जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त पनवेल मनपातर्फे जनजागृतीपर कार्यक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

जागतिक तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ३१ मे हा दिवस 'जागतिक तंबाखू विरोधी दिन' म्हणून साजरा करण्यात यतो. तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल व्यापक जनजागृती करण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या नऊ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मंगळवारी (दि. ३०) जनजागृतीपर रॅली, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याचबरोबर सर्व आरोग्य केंद्रांवरती 'ओरल हेल्थ कॅम्पचे' आयोजन करण्यात आले होते. बुधवारी (दि. ३१) सर्व आरोग्य केंद्रामध्ये तंबाखू मुक्ती करता शपथ घेण्यात येणार आहे.





तंबाखूजन्य पदार्थाच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल व्यापक जनजागृती करण्याच्या दृष्टीने शासनाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानूसार महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या नऊ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये तसेच चार आरोग्यवर्धिनी उपकेंद्रांमध्ये वैद्यकिय अधिकारी, परिचारिका व आशा सेविकांच्या माध्यमातून मंगळवारी जनजागृतीपर रॅली, रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याचबरोबर सर्व आरोग्य केंद्रांवरती 'ओरल हेल्थ कॅम्पचे' आयोजन करण्यात आले होते.

या वेळी काढण्यात आलेल्या जनजागृतीपर रॅलीमध्ये 'धुम्रपान टाळा कर्करोग टाळा' अशा घोषणांच्या बरोबरच तंबाखूमुळे होणाऱ्या रोगाची माहिती सांगणारे बॅनर, पोस्टर्सच्या, हँडबिलाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. तसेच ३० वर्षांवरील नागरिकांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली नऊ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये 'ओरल हेल्थ कॅम्पचे' आयोजन करण्यात आले होते.

जागतिक प्रौढ तंबाखू निरीक्षण २०१६–१७ (GATS-2) नुसार तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थ सेवन करणाऱ्यांचे महाराष्ट्र राज्याचे प्रमाण हे इतर राज्याच्या तुलनेत कमी असले तरी ते प्रमाण जास्त आहे हे प्रमाण १५ टक्क्याने कमी करणे अपेक्षित आहे. त्याचाच एक भाग म्हणून ३१ मे २०२३ रोजी तंबाखू विरोधी दिनानिमित्त प्रत्येक नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये तंबाखू मुक्ती करिताची शपथ घेण्यात येणार आहे.

## मोक्याच्या जागी विक्रेत्यांचे अतिक्रमण



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील मोक्याच्या ठिकाणी अनेक परप्रांतीयांसह नारळासह सरबत विक्रेत्यांनी शासनासह हॉस्पिटल परिसरातील मोक्याच्या जागा अडवल्या आहेत.

या फेरीवाल्यांनी मुख्यतः नारळपाणीवाल्यांनी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल तालुका पोलीस ठाणे समोरील शासकीय जागा, विविध रुग्णालय परिसर तसेच तहसीलदार कार्यालय परिसर, गुणे हॉस्पिटल, प्राचीन हॉस्पिटल, लाईफलाईन हॉस्पिटल, पनवेल कोर्ट मुख्यसमोरील फुटपाथवर, तक्का येथे जाणाऱ्या बायपास रोडवर, दुर्गामाता मंदिर शेजारी या ठिकाणी आपले बस्तान बसवले आहे. या नारळविक्रेत्यांमध्ये बांगलादेशी असल्याचा संशय नागरिकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या परप्रांतीयांच्या कागदपत्रांची तपासणी करावी, अशी मागणी होत आहे.

# कळंबोलीतील अनधिकृत झोपड्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सेक्टर ८ मधील भूखंडावर नव्याने बांधलेल्या १० अनधिकृत झोपड्यांवर पनवेल महापालिकेने सोमवारी कारवाई केली.



कळंबोली सेक्टर ८ मधील एका भूखंडावर दहा नवीन झोपड्या बांधण्यात आल्या होत्या. त्या मनपाच्या अतिक्रमणविरोधी पथकाने जेसीबीच्या साहाय्याने हटविल्या आहेत. मनपाच्या दक्षतेमुळे नवीन झोपडपट्टी वसविण्याचे मनसुबे उधळले आहेत. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील झोपड्या व इतर अतिक्रमणांवरही महानगरपालिकेच्या माध्यमातून आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली या ठिकाणी नियमित कारवाई केली जात असून त्याठिकाणी लक्ष ठेवण्यात येत आहे. अश्याच प्रकारे पनवेल शहर परिसरात व प्रामुख्याने मोहल्ला परिसरात अनधिकृत झोपडपट्ट्या उभारण्याचे काम काही समाजकंटक करीत आहे. त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक रहिवाशी करीत आहेत.

## तक्का गावात रिक्षाची चोरी

**पनवेल : वार्ताहर**

घरासमोर उभी केलेली रिक्षा रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पनवेल शहरातील तक्का गावात घडली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पनवेल शहरातील तक्कागाव येथे राहणाऱ्या गणेश सुतार यांनी त्यांची रिक्षा एमएच ४६ एझेड ९१४२ घरासमोर नेहमीच्या जागेवर उभी केलेली अज्ञात रिक्षा चोरट्यांनी पळवून नेली आहे. रिक्षा जागेवर दिसली नसल्यामुळे त्यांनी सर्वत्र रिक्षेचा शोध घेतला, परंतु रिक्षा सापडली नाही. त्यामुळे त्यांनी रिक्षा हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली.

# हज यात्रेकरूसांठी आरोग्य तपासणी, लसीकरण शिबिर

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका आणि महाराष्ट्रभूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमानातून हज यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरूसांठी मेंदूज्वर (मेनिन्गोकोक्कल वॅक्सीन) व हंगामी ताप (सिझनल इन्फ्लुन्झा वॅक्सीन) लसीकरण शिबीराचे आयोजन मंगळवारी महापालिके तर्फे करण्यात आले होते.आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक ३० मे व ३ जून रोजी महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालयात करण्यात आले आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातील सुमारे ३०० हून अधिक नागरिकांनी हज यात्रेसाठी लसीकरणाकरिता नाव नोंदणी केली आहे. या सर्वांचे मंगळवार ३० मे व शनिवार ३ जून रोजी लसीकरण महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रूग्णालयात करण्यात येणार आहे. यासाठी पनवेल महापालिका उपजिल्हा रूग्णालयास वैद्यकिय आरोग्य अधिकारी, वाहन व इतर आवश्यक सहकार्य करण्यात येणार आहे.

हज यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरूंनी या लसीकरण शिबीराचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकिय आरोग्य विभागाच्या वतीने आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

# सिडको वसाहतींमध्ये मनपाच्या शाळा सुरू करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या मालमत्ता करामध्ये शिक्षण विषयक कराचा समावेश आहे. गेल्या साडेसहा वर्षानंतरही सिडको वसाहतींमध्ये मनपा अशिक्षित असल्याचे एकंदरीत चित्र आहे. या ठिकाणी महापालिकेने शाळा सुरू कराव्यात, अशी मागणी शिवसेनेचे पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी महापालिका आयुक्त गणेश देशमुख व मुख्यमंत्री एकनाथ शिंदेयांच्याकडे निवेदन देऊन केली आहे.

पनवेल मनपाने पाणीपुरवठा वगळता इतर सर्व सुविधा सिडकोकडून वर्ग करून घेतल्या आहेत. महापालिकेच्या माध्यमातून नागरिकांना चांगल्या दर्जाच्या सोयी सुविधा पुरवण्याबाबत प्रशासन चांगले प्रयत्नही करीत आहे, मात्र अद्यापही महापालिकेने आपल्या स्वतःच्या शाळा हद्दीत सुरू केलेल्या नाहीत. वेगवेगळ्या कारणासाठी आरक्षित असणारे भूखंड पनवेल महापालिकेने सिडको कडून हस्तांतरित करून घेतले आहेत. काही भूखंड हे शाळेसाठी राखीव आहेत. त्या ठिकाणी पनवेल महापालिकेने स्वतःच्या शाळा सुरू कराव्यात, अशी नागरिकांची आग्रही मागणी आहे.

सिडको वसाहतीमध्ये अल्प व मध्यम उत्पादन गटातील लोकसंख्या मोठी आहे. खाजगी शिक्षण संस्थांमधील शुल्क अनेक पालकांच्या खिशाला परवडत नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून या वसाहतींमध्ये सुद्धा पनवेल महानगरपालिकेच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक शाळा असणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने राज्य सरकारकडून याबाबत ठोस असा निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी शिवसेनेचे पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## हवामान बदलाचा भाज्यांना फटका

**पनवेल : वार्ताहर**

राज्यात सध्या कुठे अवकाळी तर कुठे प्रचंड उष्णता जाणवत आहे. त्यामुळे या अवकाळी पावसाचा फटका भाजीपाल्यांसह शेतकऱ्यांच्या पीकाला बसत आहे. भाजीपाल्याला फटका बसल्याने आगामी काही दिवसात भाजीपाल्यांचे दर गगनाला भिडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, कृषी उत्पन्न बाजार समितीत अनेक भाज्यांचे दर वाढलेले आहेत.



**पनवेल : भाजप आत्मनिर्भर भारत उत्तर रायगड जिल्हा संयोजक आकाशी भाटी यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी पं. स. सदस्य निलेश पाटील, प्रशांत कर्पे, आदित्य म्हात्रे, रजत जगे, विरल चोथानी, हर्ष शेट्ये, नीरज कुलकर्णी आदी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

# रामबाग अप्रतिम -दशरथ पाटील

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील न्हावाखाडी (उलवे नोड) येथील रामबागला अखिल आगरी समाज परिषदेचे अध्यक्ष दशरथ पाटील आणि डेल्टा ग्रुपचे चेअरमन बाबूभाई पटेल यांनी भेट दिली. या वेळी त्यांनी तेथे उपस्थित माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याशी संवाद साधून रामबाग अप्रतिम असल्याचे कौतुक केले.



रामबागला भेट देऊन अतिशय आनंद वाटला. समाजाची जबाबदारी अत्यंत चांगल्या प्रकारे सांभाळत असताना सामाजिक बांधिलकी जपत सर्वसमावेशक लोकांना काय आवडेल असा विचार करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रामबाग उभारली आहे. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक या ठिकाणीही अशा प्रकारची वास्तू आजही नाही आणि अशी वास्तू एका खेड्यात उभारणे तेही स्वखर्चाने उभारणे यासारखी मोठी गोष्ट नाही. हे परमेश्वराने घडवून आणले आहे, कारण शेवटी देवच ठरवतो की कोणती वास्तू कोण निर्माण करू शकेल, त्याचेच उदाहरण म्हणजे रामबाग. लोकांना मानसिक आनंद देण्याचे हे काम खरंच पुण्यदायी आहे. मी रामशेठसाहेबांना सांगेन, तुम्हाला दीर्घायुष्य लाभो आणि अशीच जनसेवा घडो.

दशरथ पाटील व बाबूभाई पटेल यांच्याशी संवाद साधताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासोबत म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी. एल. ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, टीआयपीएलचे इंजिनिअर शिवाजी अहिरकर तसेच न्हावेखाडी उत्तरपाडा ग्रामस्थ उपस्थित होते.



## संपादकीय

# महानायकाला मानवंदना

अखेरच्या दोन चेंडूंवर एक षटकार आणि एक चौकार तडकावून रवींद्र जडेजाने चेन्नई सुपर किंग्ज संघाला आयपीएल चषक स्पर्धेत पाचव्यांदा विजेतेपद मिळवून दिले. त्याचा आदर्श, त्याचा महानायक आणि त्याचा कर्णधार महेंद्रसिंह धोनी याला ही एक प्रकारे मानवंदनाच होती. हे विजेतेपद आपल्या लाडक्या कर्णधाराला मिळवून देताना जडेजाची जी भावना असेल तीच धोनीच्या तमाम चाहत्यांची असणार.

**वयाच्या ४१व्या वर्षी अजूनही अनोख्या तडफेने खेळणारा एमएसडी ऊर्फ महेंद्रसिंह धोनी आयपीएलच्या हंगामात आवर्जून खेळतो. कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटमधून त्याने केव्हाच निवृत्ती पत्करली आहे. चेन्नईच्या संघाचे त्याच्यावाचून पान हलत नाही. रांचीचा हा खेळगडी चेन्नईसह अवघ्या तामिळनाडूने आता आपला मानला आहे. 'थलैवा' या लाडक्या संबोधनाने त्याच्याबद्दल दक्षिणेत बोलले जाते. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यामध्ये सोमवारी रात्री रंगलेल्या आयपीएल स्पर्धेच्या अंतिम लढतीत रोमहर्षक विजय मिळवल्यानंतरदेखील कर्णधार धोनीचे पाय जमिनीवरच राहिले. निवृत्तीसाठी यासारखा सुंदर क्षण नाही, पण चाहत्यांच्या प्रेमामुळेच हा निर्णय माझ्यासाठी कठीण होऊन बसला आहे असे धोनी म्हणाला. 'धोनी-धोनी'च्या गजराने यंदाचा आयपीएलचा हंगाम दुमदुमत होता हे खरेच. गुजरात टायटन्सविरुद्धचा अंतिम सामना रविवारीच होणार होता, पण पावसामुळे त्या दिवशी मिनिटभराचा खेळही शक्य झाला नाही. आयपीएलच्या नियमानुसार दुसऱ्या दिवशी म्हणजेच सोमवारच्या राखीव दिवशी अंतिम लढत झाली, तेव्हाही पावसाने धावती हजेरी लावलीच. नाणेफेक जिंकल्यानंतर चेन्नईने आधी क्षेत्ररक्षण स्वीकारले. गुजरात टायटन्सच्या वृद्धिमान साहा आणि शुभमन गिल या तरुण फलंदाजांनी चेन्नईच्या गोलंदाजांची अक्षरश: धुलाई करत २१४ धावांचा डोंगर रचला. गुजरात टायटन्सचा डाव संपता-संपताच मुसळधार पाऊस कोसळू लागला. त्यामुळे चेन्नई सुपर किंग्जसमोर १५ षटकांमध्ये १७१ धावा करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. चेन्नईकडून डेव्हन कॉन्व्हे याने २५ चेंडूंत ४७ धावा कुटल्या, तर शिवम दुबेने २१ चेंडूंत ३२ धावांची भर घातली. अजिंक्य राहणेने अवघ्या १३ चेंडूंत २७ धावांची बेगमी केली, तिच चेन्नईसाठी बहुमोलाची ठरली. त्यानंतर आलेल्या रवींद्र जाडेजाने चेन्नईला विजयापर्यंत नेले. कर्णधार महेंद्रसिंह धोनी शून्यावर बाद झाला तरीही जडेजाने आपली दिलेरी शेवटच्या चेंडूपर्यंत कायम ठेवली हे निश्चितच कौतुकास्पद आहे. लढतीनंतर जडेजाने समाजमाध्यमांवर करंडकासह कर्णधार धोनीसमवेत फोटो टाकला. त्यासोबतची ओळ फार महत्त्वाची आहे. तो लिहितो की, माहीभाई आप के लिए तो कुछ भी! हीच भावना धोनीच्या लाखो चाहत्यांची असणार यात शंका नाही. विजेतेपदाच्या करंडकासह चेन्नई सुपर किंग्जला २० कोटी रुपयांचे इनाम प्राप्त झाले. उपविजेत्या गुजरात टायटन्सला साडेबारा कोटी रुपयांच्या इनामाच्या रकमेची कमाई करता आली. आयपीएलमध्ये क्रिकेट कमी आणि व्यवसाय अधिक असतो असा तक्रारीचा सूर शास्त्रशुद्ध क्रिकेटचे चाहते लावत असतात. त्यात थोडेफार तथ्यदेखील आहे, परंतु आयपीएलसारख्या स्पर्धांमधून शुभमन गिल, वृद्धिमन साहा अशांसारखे उगवते तारे चमकतात. एका अर्थी आयपीएल ही भारतीय क्रिकेट नियामक मंडळासाठी पैशाची खाण असली तरी भविष्यातील प्रतिभावान क्रिकेटपटूंना संधी देणारी ती हिरे-माणकांचीदेखील खाण आहे हे मान्य करावे लागेल.**

# बेरोजगारांनो सावधान!





**खबरबात**
**नितीन देशमुख**


घरबसल्या पार्ट टाईम काम, पेपर रायटिंग, कॉपी पेस्टिंग आणि डेटा एंट्रीचे काम करून महिना हजारो रुपये कमवा अशा जाहिराती आपण लोकल ट्रेनमध्ये लावलेल्या आणि वर्तमानपत्रात नेहमी वाचत असतो. आज नोकरी मिळवणे ही मोठी समस्या झाली आहे. अनेक इंजिनियर, पदवीधर तरुण-तरुणी नोकरीसाठी धडपडताना पहात असतो. पालक ही आपल्या मुलांना नोकरी लागावी यासाठी पैसे द्यायला तयार असल्याचे आपण पाहत असतो. लाखो रुपये देऊन नोकरी न मिळाल्याने फसवल्याचे गुन्हे रोजचे पोलीस ठाण्यात दाखल होत असल्याच्या बातम्या आपण वाचत असतो तरीही या जाहिराती वाचल्यावर प्रत्येकाला एवढ्या झटपट पैसे कमावण्याची संधी साधण्याचा मोह झाल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे रोज पुन्हा नवीन माणसे फसताना आपण पाहतो.

घरबसल्या पार्ट टाईम काम, पेपर रायटिंग, कॉपी पेस्टिंग आणि डेटा एंट्रीचे काम करून महिना हजारो रुपये कमवा अशा जाहिराती वाचून त्या ठिकाणी तुम्ही गेलात तर तुम्हाला एअर कंडिशन ऑफिसमध्ये बसलेली रिसेप्शनिस्ट तरुणी तुमचे स्वागत करते. सर, कामात आहेत तुम्ही जरा वेळ बसा असे सांगते एक जण तुम्हाला पाणी आणून देतो. आजूबाजूला नोटीस बोर्डवर मराठी पुस्तकांची कव्हर टाचणीने लावलेली असतात तुमच्या सारखे आणखी तीन-चार जण तिथे बसलेले असतात. काही वेळात आणखी काही जण येतात. मग तुम्हाला केबिनमध्ये बोलावले जाते आतमध्ये बसलेली व्यक्ती तुमची विचारपूस करते कोठून आलात, काय करता तुमची थोडीशी कौटूंबिक माहिती विचारली जाते आणि रजिस्ट्रेशन फी म्हणून एक हजारपासून १५०० रुपयापर्यंत भरायला सांगितले जातात. त्यानंतर पाच ते सहा जणांच्या ग्रुपला एकत्र बसवून तेथील तरूणी तुम्हाला कामाची माहिती देते.

ती तरुणी तुम्हाला एक मराठी पुस्तक दाखवते याची कॉपी कागदावर पेनने करून आणायची आहे. तुम्हाला कोरे पेपर आणि पेन आम्ही देऊ त्यावर रेषा मारून तुम्ही लिहायचे आहे. तुम्हाला एका पानाचे २० ते ३० रुपये मिळतील. त्यामध्ये चूका झाल्यास पैसे कापले जातील १० पेक्षा जास्त चुका झाल्यास त्या पानाचे पैसे मिळणार नाहीत. काम दिसायला सोपे असते. कोणालाही वाटते आपण दिवसात सहज १५ ते २० पाने लिहू शकतो म्हणजे ५०० ते ६०० रुपये घरबसल्या सहज मिळवू शकतो. सगळे काम करायला लगेच तयार होतात. मग तुम्हाला बाहेर जाऊन साहित्य घेण्यास सांगितले जाते. दूसरा ग्रुप आत येतो. तुम्हाला भरलेल्या पैशाच्या मोबदल्यात एक दोन रुपयाचा पेन, दोन डझन कोरे कागद आणि एका पुस्तकाची काही पाने दिली जातात. हे काम १५ दिवसांत पूर्ण करा मग पुढील काम मिळेल. दिलेले काम तपासल्यावर त्याचे पैसे आठवड्याने तुम्हाला मिळतील असे सांगितले जाते.

काम घेऊन खुशीत तुम्ही घरी येता. मग कामाला सुरुवात केल्यावर कळते की बारीक टाईपमध्ये असलेल्या पुस्तकाची कॉपी करणे सोपे नाही. दोन तासांत एक पान पूर्ण होते. त्यामध्ये अनेक चूका झालेल्या असतात म्हणजे दोन तास काम करून दोन रुपयेही मिळू शकत नाहीत हे लक्षात येते. मग आपले डोळे उघडतात की आपण दोन रुपयाचे पेन आणि दोन डझन कागदासाठी हजार किंवा जास्त रुपये देऊन पुस्तकाची पाने म्हणजे रद्दी घेऊन आलो आहोत, पण या ऑफिस टाकून बसलेल्याला रोज १० माणसे तरी मिळाली असे धरले तर १० हजार कोठेच गेले नाही. महिना दोन लाख ६० हजार त्यापैकी पगार, भाडे आणि इतर खर्च ६० हजार गेले तरी दोन लाख रुपये मिळत आहेत. बेकारांना फसवणुकीचा हा धंदा सध्या जोरात सुरू आहे. याकडे पोलिसांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे.

# सांगावा पावसाचा आला...

वैशाख महिना संपून ज्येष्ठ महिन्याला सुरुवात झाली आहे. यावर्षी अतिउष्ण अशा उन्हाळ्याच्या झळानी मनुष्य, प्राणी, पशुपक्षी बेजार झाले असताना जेष्ठ महिन्याच्या आगमना बरोबर पावसाळा ऋतूची चाहूल लागायला सुरुवात झाली आहे. साधारणपणे वैशाख महिन्यातच पावसाच्या आगमनाचे संकेत मिळतात. यावर्षी हवामान खात्याने सर्वसाधारण पावसाळा राहील असे भाकीत केले आहे, मात्र येणाऱ्या पावसाळ्याचे संकेत निसर्ग देत असून वैशाखाच्या रणरणत्या उन्हात व जेष्ठाच्या आगमनात पावसाळा ऋतुची चाहूल लागली आहे.

माळरानावर झाडाझुडपांमध्ये हिरवी पानगळ आली आहे. विविध प्रकारच्या रानभाज्या उगवण्यास सुरुवात झाली असून विविध प्रकारचे पक्षी झाडांवर बांबूच्या बेटांमध्ये आपापली घरटी तयार करत आहेत. पावसाळा ऋतूपूर्वी कावळा, चिमणी, भरद्वाज व इतर पक्ष आपापली घरटी बांधतात. जाणकारांच्या म्हणण्यानुसार अनेक पक्षी पावसाळयाच्या संकेतानुसार आपापली घरटी कमी जास्त उंचीवर बांधतात. यावर्षी अनेक पक्षांनी आपली घरटी ही मध्यम उंचीवर बांधली असल्याचे दिसून येत आहे. तसेच रानकोंबडी व इतर पक्षांनी आपापली घरटी बांधून अंडी घातली आहेत.

शेवला, कुडा यासारख्या रानभाज्या पावसाळा सुरू होण्यापूर्वी दहा ते पंधरा दिवस अगोदरच उगवून येतात. या रानभाज्या उगवल्या असून पावसाचे संकेत मिळत आहेत. पावसाळ्याच्या आगमनापूर्वी कोकीळ मोठ्या आवाजात ओरडत असतो. कोकिलचा आवाज हे पावसाच्या आगमनाचे चिन्ह मानले जाते. कोकीळ सर्वत्र ओरडताना दिसत असल्याने पावसाळा जवळ आल्याचे जाणकार सांगतात. दिवसभर हवामानात बदल होत असून ढगाळ हवामानाचा अनुभव येण्यास सुरुवात झाली आहे.

पावसाचा अंदाज घेऊन शेतकऱ्यांनीही शेतीची कामे सुरू केली असून बांधबंधिस्तीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणाऱ्या पावसाचे संकेत निसर्ग मित्र जाणकार, पक्षी, विविध कीटक व शेतकऱ्यांना मिळत असून पावसाचा सांगावा आल्याने पावसाच्या स्वागताची तयारी शेतकरी, पशुपक्षी करत आहेत.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी विविध पक्षी आपापली घरटी बांधतात. यावर्षीही पक्षांनी आपापली घरटी बांधण्यास सुरूवात केली असून मध्यम उंचीवर काही पक्षांची घरटी दिसतात. सर्वसाधारण पाऊस पडणार असेल तर अशा प्रकारची घरटी दिसून येतात, असे पक्षी निरीक्षक व निसर्गप्रेमी विलास देगावकर यांनी सांगितले.

**-सलीम शेख, माणगाव**



## बदलते तंत्रज्ञान

# यूपीआयद्वारे होणारे स्कॅम 'असे' टाळता येतील

भारतात डिजिटल व्यवहारांचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. ऑनलाइन शॉपिंग, शाळेची फी, पेट्रोल आणि डिझेल भरण्यासाठी लोक डिजिटल पद्धतींचा अवलंब करत आहेत. ऑनलाइन व्यवहारांसाठी युनिफाइड पेमेंट इंटरफेस (UPI) हे आपल्यामध्ये क्रांतीसारखे आले आहे. यूपीआयने भारतात व्यवहार करण्याची पद्धत पूर्णपणे बदलली आहे.



देशात मोठ्या प्रमाणावर रोखीचे व्यवहार होतात, पण आता यूपीआय पेमेंटची क्रेझही सातत्याने वाढत आहे. मात्र, यूपीआयच्या झपाट्याने वाढ होत असल्याने फसवणुकीची प्रकरणेही समोर येत आहेत. आजच्या काळात व्हॉट्सअॅप स्कॅम, पार्ट-टाइम जॉब स्कॅम, सिनेमा स्कॅम यांसारख्या ऑनलाइन स्कॅमची प्रकरणे सातत्याने समोर येत आहेत. यूपीआय देखील स्कॅमर्सच्या नजरेतून सुटलेले नाही. यूपीआयद्वारे फसवणूक झाल्याची घटना नवीन नाही.

यूपीआयच्या माध्यमातून फसवणुकीचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. सायबर गुन्हेगार यूपीआयच्या माध्यमातून लोकांची अनेक प्रकारे फसवणूक करतात.

**पैसे रिफंड मागण्याचा बहाना :** स्कॅमर्स लोकांच्या यूपीआय खात्यात पैसे ट्रान्सफर करतात आणि म्हणतात की, ते चुकून ट्रान्सफर झाले. यानंतर लोकांना हे पैसे परत करण्यास सांगितले जाते. त्यासाठी यूपीआयची लिंक पाठवली जाते. तुम्ही या लिंकवर क्लिक करताच, तुमच्या फोनचे नियंत्रण स्कॅमर्सकडे जाते आणि ते डिजिटल वॉलेट आणि बँक खात्यांमधून पैसे चोरतात.

QR कोडद्वारे फसवणूक : स्कॅमर्स QR कोडद्वारे फसवणूक करतात. सायबर ठग लोकांना क्यूआर कोड पाठवतात. तुम्ही UPI पिन टाकताच तुमच्या खात्यातून पैसे डेबिट केले जातात. या पद्धती यूपीआय फसवणूक टाळण्यात मदत होऊ शकते

* जर कोणी म्हणत असेल की त्याने चुकून तुमच्या यूपीआय खात्यात पैसे ट्रान्सफर केले आहेत, तर आधी त्यासंबंधी सखोल चौकशी करा. त्या व्यक्तीच्या ओळखीची पुष्टी करा आणि कोणतीही लिंक आली तर त्यावर क्लिक करू नका.

* तुमचा यूपीआय पिन कोणाशीही शेअर करू नका. तो फक्त स्वतःशी व्यवहार करण्यासाठी वापरा.

* लेटेस्ट स्कॅम आणि फ्रॉड करण्याच्या पद्धतींवर लक्ष ठेवा. यावरून तुम्हाला कळेल की स्कॅमर्स लोकांची फसवणूक करण्यासाठी कसे डावपेच अवलंबतात.

# महाराणी अहिल्याबाई होळकर



**निमित्त**

एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चौंडी या छोट्याशा गावात (जिल्हा बीड) माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दांपत्यापोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले.

खंडेरावांच्या आईचे नाव गौतमीबाई होते; खंडेराव हे व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्याबाईंनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या या सूनबाईंवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता आणि खूप महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्याबाईंवरच सोपवीत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या. अहिल्या-बाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले.पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या. पण सासरे म्हणाले, प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे.

आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा अहिल्याबाई होळकरत्यांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर असत, तेव्हा स्वतः अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत.

अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदारवृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्य कारभार करणार ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबादादांशी त्यांनी अहिल्याबाईंविरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले.

अहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. त्यांनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. यांशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर,मल्लिकार्जुन, औंढानागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वर आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मीळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. मोरोपंत व शाहीर अनंत फंदी यांचा अहिल्याबाईंनी आदर-सत्कार करून अनंत फंदीस सल्लाही दिला आणि तमासगिरीपासून परावृत्त केले.

अखेरच्या दिवसांत त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथ्याबा ऐन तारुण्यात गेला (१७९०), तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली. अशा बिकट परिस्थितीत शिंद्यांचा सरदार गोपाळराव याने १७९२ मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हा तरुणासही लाजवील अशा तडफदारीने त्यांनी शिंद्यांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या; पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी चोख उत्तर दिले.

मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्रीकर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती, हे त्यांचे आयुष्यच सांगते. महेश्वर येथे वृद्धापकाळाने त्यांचे १३ ऑगस्ट १७९५ रोजी निधन झाले.

**(साभार : विकासपीडिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**खारघर : निसर्ग आपल्याला अनेक गोष्टी शिकवत असतो. एका सरळ ओळीत उभी ही झाडे समानतेची जाणीव करून देत असल्याचे या दृष्यातून दिसते.** (छाया : तन्वी पवार)


## आरोग्य प्रहर

# दात दुखत असल्यास करा 'हे' सहज, सोपे उपाय

आजकाल दातदुखीची समस्या ही बऱ्याच लोकांना होताना दिसते. यामध्ये मग लहाणांपासून ते मोठ्यांपर्यंत प्रत्येकाला दातदुखीचा त्रास सतवत असतो. यामध्ये मग चॉकलेट खाल्ल्याने, थंड पदार्थ खाल्ल्याने अशा अनेक गोष्टींमुळे दात दुखीची समस्या निर्माण होते. तसंच जेव्हा दातदुखी सुरू होते तेव्हा डोके देखील गरगरायला लागते त्यामुळे आणखी त्रास होतो. अशावेळी आपण डेंटिस्टकडे जाऊन उपचार घेतो. पण आज आपण काही अशा घरगुती उपचारांबाबत जाणून घेणार आहोत ज्यामुळे तुमचा हा त्रास नक्की दूर होईल.




**१. लवंग :** लवंग हा एक मसाल्याचा प्रकार आहे. हा जरी मसाल्याचा प्रकार असला तरी यात काही असे घटक आहेत जे तुमची दातदुखी कमी करते. ज्यावेळी तुम्हाला दातदुखीचा त्रास जाणवत असेल त्यावेळी जिथे दुखत आहे त्या दातांच्या मध्ये लवंग ठेवून ती थोडी थोडी चावावी जेणेकरून त्याचा रस दातांमध्ये जाईल. लवंग दातांमध्ये धरल्याने तुमची दातदुखी नक्कीच कमी होईल.



**२. पेरूची पाने :** तुम्ही पेरू आवडीनं खात असाल. पण तुम्हाला माहितीये का की या गोड पेरूसोबत त्याच्या झाडाची पाने खूप फायदेशीर आहेत. पेरूची पाने स्वच्छ धुवून घ्या आणि ती हळू हळू चावून खा यामुळे तुमच्या दातदुखीचा त्रास कमी होईल.



**३. गरम पाणी :** गरम पाणीदेखील दात दुखीवर जालिम उपाय आहे. एका भांड्यात गरम पाणी करा आणि त्यात अर्धा चमचा मीठ टाका. त्यानंतर या पाण्याचे घोट घ्या आणि ते तोंडात तसेच ठेवा ते पाणी गिळू नका जेणेकरून तुमच्या तोंडातील जंतू निघून जातील. ही प्रक्रिया जर तुम्ही १० ते १५ मिनिटे केली, तर तुमचा दातदुखीचा त्रास नक्कीच दूर होईल.



# रोह्यात अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडी

## वाहनांसंदर्भात नियोजन करण्याची नागरिकांची मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरातून जाणार्‍या राज्यमार्गाचे काम टकाटक झाले आहे. सिमेंट काँक्रीटच्या रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून साईडला गटाराचेही काम सुरू आहे, परंतु या रस्त्यावर दोन्ही बाजूने चारचाकी, दुचाकी वाहने उभी करीत असल्यामुळे वाहतूक कोंडीच्या समस्येला रोहेकरांना तोंड द्यावे लागत आहे.



रोहा शहरातून जाणार्‍या राज्यमार्गाच्या काँक्रीटीकरणाचे काम चांगल्या प्रतीचे झाले असून यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे, परंतु दुचाकीस्वार या रस्त्यावरून बेफाम सुटताना दिसत आहेत. त्याचप्रमाणे रस्त्याचे रूंदीकरण झाल्याने रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या संख्येने दुचाकी व चारचाकी उभ्या करण्यात येत आहेत. या अनधिकृत पार्किंगमुळे शहरात वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. ही समस्या फिरोज टॉकीज ते नवरत्न हॉटेलपर्यंत जास्त जाणवत आहे. महत्त्वाचे म्हणजे सागर डेअरी ते रोहा एसटी स्टँड परिसरात मोठ्या संख्येने वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. शहरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हाणून स्वतंत्र पार्किंग क्षेत्र निर्माण करण्याची मागणी नागरिकांमधून गेल्या काही वर्षांपासून करण्यात येत आहे, मात्र याबाबत अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

रोहा नगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्तरित्या वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे नागरिकांमधून बोलले जात आहे.

# अर्ध्या किमतीत सोने देतो सांगून फसवणूक

## तिघांना अटक; एक जण फरार

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेतात नांगरणी करताना जुने सोने सापडले आहे, बाजारभावाच्या अर्ध्या किमतीत हे सोने देतो असे सांगून अनेकांची फसवणूक करणार्‍या टोळीतील तिघांना रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषन विभागाने अटक केली. एक आरोपी फरार आहे त्याचा शोध सुरू आहे.



शिवाजी विठ्ठल मोहिते, वशिकला कांतीलाल पवार, अनिता रजनकांत भोसले अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. अटक केलेल्या तिघांकडून १३ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

कमी किमतीत सोने देतो सांगून फसवणूक केल्या प्रकरणी एक गुन्हा नागोठणे पोलीस ठाण्यात दाखल झाला होता. गुन्ह्याचे स्वरूप लक्षात घेऊन रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या प्रकरणाचा समांतर तपास करण्याचे निर्देश स्थानिक गुन्हे अन्वेशन शाखेला दिले. तपास सुरू असताना पोलीस अंमलदार जितेंद्र चव्हाण यांना या गुन्ह्यातील आरोपी अहमदनगर आणि परांडा येथील असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांचे एक पथक अहमदनगर तर दुसरे पथक परांडा येथे रवाना झाले. संशयित आरोपींना त्यांनी ताब्यात घेतले. सखोल चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबूली दिली. यानंतर त्यांच्याकडून गुन्ह्यात फसवणूक केलेल्या एकूण रकमेपैकी ७० टक्के रक्कम म्हणजेच १३ लाख रुपये पोलिसांनी हस्तगत केले.

स्थानिक गुन्हे शाखेचे प्रमुख दयानंद गावडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक धनाजी साठे, पोलीस उपनिरीक्षक दिपक मोरे, अंमलदार जितेंद्र चव्हाण, विकास खैरनार, पोलीस नाईक अक्षय जाधव, अक्षय सावंत, मोनिका मोरे आणि सायबर सेलच्या अक्षय पाटील आणि तुषार घरत यांनी या कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली.

# खंडाळा घाटात रिक्षा उलटली; चौघे जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

परळी वैजनाथ या आपल्या गावी मुलीचे लग्न पार करून, नवी मुंबईकडे रिक्षाने येत असलेल्या कुटुंबाचा खंडाळा घाटात रिक्षा उलटून अपघात घडला. सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही, मात्र सुरेखा विष्णू गुट्टे (वय ४१) व दोन मुली जखमी झाल्या. सुरेखा विष्णू गुट्टे या गंभीर जखमी झाल्याने त्यांच्यावर खोपोली नगरपालिका येथे प्राथमिक उपचार झाल्यावर एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. खंडाळा घाटात मंगळवारी (दि. ३०) ११ वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला.



विष्णू राम गुट्टे (वय ४६, रा. नवी मुंबई) हे मुलीचा लग्न समारंभ आटपून मंगळवारी नवी मुंबईला आपल्या रिक्षाने पत्नी व तीन मुलींना घेऊन येत होते. खंडाळा घाट येथील शिंग्रोबा मंदिर तीव्र वळण व उतारावर रिक्षा अनियंत्रित होऊन रस्त्याच्या बाहेर जाऊन उलटली. यात विष्णू राम गुट्टे व दोन मुली किरकोळ तर पत्नी सुरेखा विष्णू गुट्टे या गंभीर जखमी झाल्या आहेत. ऑटो रिक्षाचेही मोठे नुकसान झाले आहे.

अपघाताची माहिती होताच खंडाळा घाट वाहतूक पोलीस यंत्रणा, अन्य यंत्रणांनी तात्काळ मदत करून या अपघातातील जखमींना तातडीने खोपोली पालिका रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

# पोलादपुरातील स्त्रीशक्ती समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील महिलांनी राज्य व केंद्रसरकारच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करावा. यामुळे शासनाचे उद्दीष्ट आणि महिलांना लाभ अशा दोन्ही पूर्तता होत असून सर्व शासकीय विभागांचे स्टॉल्स सभागृहामध्ये असल्याने या स्टॉल्समुळे महिलांना योजनांची माहिती घेणे शक्य होणार आहे, असे प्रतिपादन प्रभारी तहसीलदार पुनम कदम यांनी केले.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्त्रीशक्ती समाधान शिबिरावेळी ते बोलत होते. या वेळी राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष शैलेश पालकर, सहाय्यक गटविकास अधिकारी चिमाजी हंबीर, एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या बालविकास प्रकल्प अधिकारी तथा सदस्य सचिव माधुरी फड, तहसील पुरवठा विभागाचे अव्वल कारकून आबा जगताप, पर्यवेक्षिका गीता उतेकर तसेच विस्तार अधिकारी शिंदे आदी उपस्थित होते. माजी राजिप महिला व बालकल्याण सभापती संगिता कासार यांनी भेट दिली.

शिबिरात पोस्ट ऑफिसमधील योजनांची माहिती विद्या चव्हाण, जिल्हा विकास यंत्रणेसंदर्भातील माहिती विशाल चुमळे, शिक्षण विभागाची माहिती रंजना जाधव, आरोग्य योजनांची माहिती वर्षा धुमाळे, तालुका कृषी कार्यालयाच्या महिलांविषयक योजनांची माहिती अनिल वालेकर, तहसील कार्यालयातील योजनांची माहिती आबासाहेब जगताप, महावितरणच्या योजनांची माहिती नयना पाटेकर, जि. प. महिला व बालविकास माहिती गोविंद फड, तृप्ती सुकाळे, घरकुल योजनेची विकास शिंदे, पंचायत समिताच्या विविध योजनांची माहिती चिमाजी हंबीर, नगरपंचायतीच्या विविध योजनांची माहिती रुपेश जाधव तसेच पोलादपूर कोकण महिला उत्पादक कंपनी लिमिटेडची माहिती सिमा साने यांनी दिली.

# ज्योविस आयुर्वेदातर्फे संज्योग सोहळा उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

ज्योविस आयुर्वेदाच्या १८व्या वर्धापन दिनानिमित्त संज्योग-२०२३ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आयेशा वाडकर हिने कथ्थक नृत्याद्वारे गणेश वंदना सादर केली. वैद्य रामदास आव्हाड यांच्या हस्ते दीपप्रज्वलित करून समारंभ सुरू करण्यात आला.

या वेळी अभिनेत्री भार्गवी चिरमुले, प्राची पिसाट, डॉ. राज सातपुते, डॉ. ज्योती सातपुते, माजी आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, वैद्य महेश शिंदे, वैद्य गिरीश भट्टाड, मनीषा सुर्वे आदी उपस्थित होते. प्रशिक्षणार्थी डॉक्टरांच्या स्पर्धेचे आयोजन या वेळी केले होते. त्यामध्ये प्रथम मानसी अभंग, द्वितीय प्राची चावडे, तृतीय अश्विनी राठोड यांनी पटकावला, तर उत्तेजनार्थ म्हणून शुभम काळे, नेहाल पाटील आणि हृतिक पांडे यांना भेटवस्तू व धनादेश देण्यात आले.

पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी मार्गदर्शन करताना, ॲलोपथी उपचार पद्धतीचे चांगल्याप्रकारे संशोधन झाले आहे. त्यामुळे रुग्ण त्या उपचार पद्धतीकडे जास्त प्रमाणात जातात. आयुर्वेद उपचार पद्धतीचे संशोधन होणे गरजेचे आहे, तसेच त्याचा योग्य प्रसार व प्रचार अपेक्षित आहे. ज्योविसची टीम चांगले काम करीत आहे, असे स्पष्ट केले.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**

**पिनकोड - ४९० २०६**

**E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in**

**दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स ०२२-२७४६७४४०**

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ३८**

**(ई-निविदा) सन २०२३ - २४**

सार्वजनिक बांधकाम (सा. बां.) विभाग, पनवेल हे ( दुरध्वनी क्र. ०२२ - २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप - या निविदेमध्ये एकूण ०८ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ३१.०५.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक ०८.०६.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदाजा. क्र. / सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड ,
दिनांक :- ३१/०५/२०२३

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**


# मुलींनी स्पर्धा परीक्षांमधून यशस्वी व्हावे -तहसीलदार विकास गारुडकर

**माणगाव : प्रतिनिधी**

आजच्या मुली स्पर्धा परीक्षांमधून उच्च पदस्थ पदावर बसल्या तरच अहिल्यादेवी होळकर स्त्रीशक्ती समस्या समाधान शिबिराचे फलश्रुती झाल्यासारखे वाटेल, असे प्रतिपादन तहसीलदार विकास गारुडकर यांनी केले.

माणगाव मध्यवर्ती प्रशासकीय भवन येथे मंगळवारी (दि. ३०) तहसीलदार विकास गारुडकर यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सशक्त नारी, समृद्ध भारत जनजागृतीसाठी स्त्रीशक्ती समस्या समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी, नायब तहसीलदार माने, बी. वाय. भाबड, गटविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, गटशिक्षणाधिकारी थोरात आदी उपस्थित होते.

तहसिलदारांनी शासनाच्या इतर विभागाच्या निरनिराळ्या योजनांची माहिती दिली. या शिबिरात ११६ महिलांची तपासणी करण्यात आली. बालसंगोपनाचे ३९ फॉर्म भरून घेण्यात आले. इतर विभागामार्फत त्यांच्या निरनिराळ्या योजनांची माहिती देऊन तक्रारी स्वीकारण्यात आल्या संपूर्ण कार्यक्रमासाठी सुमारे ३७५ महिलांनी हजेरी लावली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बालविकास प्रकल्पाचे प्रफुल्ल बागल यांनी केले. सर्व मान्यवरांचे व महिलांचे एकात्मिक लवकास सेवा योजना पर्यवेक्षिका वनिता मदगे यांनी आभार मानले.





## निवडक

### ‘नादब्रह्म’च्या कार्यक्रमाने श्रोते मंत्रमुग्ध



**खोपोली** : स्वतंत्र्यवीर सावरकर यांच्या १४०व्या जयंतीनिमित्त ब्राह्मण सभेतर्फे नादब्रह्म वाद्यवृंदने गीत सावरकर या स्वातंत्र्यवीर सावरकर रचित गीतांचा कार्यक्रमाचे आयोजन रविवारी ब्राह्मण सभा सभागृहात करण्यात आले होते. ओंकार भट, रोहित कुलकर्णी, रमाजानकी कुलकर्णी, मुग्धा पेंडसे यांनी एकाहून एक सरस स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या गाजलेल्या एकूण १३ गीतांचे सादरीकरण केले. संवादिनीवर तेजस जोशी तर तबल्यावर राकेश कुलकर्णी यांनी उत्तम साथ दिली होती. निवेदनाची बाजू विद्या डोंगरे यांनी उत्तमरित्या सांभाळली. कार्यक्रमाला ब्राह्मण सभेचे अध्यक्ष आणि रानडे, माजी अध्यक्ष दीपक बाम, नरेंद्र हर्डीकर, जेस्ट पत्रकार रवींद्र घोडके, सुधाकर भट, कोमसाप अध्यक्ष उज्वला दिघे, त्याचप्रमाणे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

### पर्यावरण दिनी शिक्षक करणार वृक्षारोपण

**रोहे** : महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात येणार आहे. शिक्षक आपल्या शाळेच्या परिसरात, घरासमोरील प्रांगणात किंवा जिथे शक्य असेल तिथे किमान दोन झाडे लावणार आहेत. यासाठी जिल्हाध्यक्ष अजय कापसे, कोषाध्यक्ष ब्रिजेश भादेकर, रोहा तालुकाध्यक्ष नारायण गायकर, सरचिटणीस संतोष धोत्रे, जिल्हा समन्वयक संतोष यादव, जिल्हा कार्यालयीन चिटणीस किशोर जाधव, रोहा कार्यालयीन चिटणीस विनायक शिंदे, कार्याध्यक्ष रोहा शाशिकांत शेळके, जिल्हा महिला अध्यक्षा विद्या रोहेकर, रोहा महिलाध्यक्षा लिना सुर्वे आदी परिश्रम घेत आहेत.


**पनवेल महानगरपालिका**

**नगरपथविक्रेता समिती निवडणूक सन २०२३ - २४ करिता**

**माघारीनंतर उमेदवारांची अंतिम यादी**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव, पत्ता व नोंदणी क्रमांक | प्रवर्ग | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. रितेश महादेव खकाळ, रा. दत्तकृपा सोसायटी, रुम नं. २४, से. ६, नविन पनवेल ८०२७९६ _HK_३९७६७९१४१९०१ | सर्वसाधारण | वैध |
| २ | श्रीम. आशा राजू मोरे, रा. वास्तुविहार, से. १४, खारघर ८०२७९६_HK_६८२२५३०९८९५१ | सर्वसाधारण (महिला) | वैध |
| ३ | श्रीम. सुचिता गजानन इवलेकर, रा. छट अपार्टमेंट, ए-३०३, प्लॉट नं. ३, से. १२, कामोठे ८०२७९६_HK_६८१९९६५०१५६१ | विकलांग (महिला) | वैध |
| ४ | श्रीम. प्रतिक्षा अनिल माळी, रा. बी-१७/२, कुंजविहार सोसायटी, घरकुल, से. १५, खारघर ८०२७९६_HK_३४२५८८५२४०४३ | इतर मागास प्रवर्ग | वैध |
| ५ | श्रीम. पुष्पा धाया गोवारी, रा. घर नं. १३४६. से. १७. यमुना बिल्डींगजवळ, कामोठे ८०२७९६_HK_५६४६४५८८७१६४ | इतर मागास प्रवर्ग | वैध |
| ६ | श्री. मंगेश पंढरीनाथ गोवारी, रा. १२४० - ए, मानसरोवर रोड, जुई-कामोठे ८०२७९६_HK_४०४८५७८१७६६१ | सर्वसाधारण | वैध |
| ७ | श्रीम. अंजू राजू कोळी, रा. घर नं. ११५३, वडघर, ता. पनवेल ८०२७९६_HK_२४५०७१९१२०६१ | विकलांग (महिला) | वैध |
| ८ | श्रीम. शारदा विश्वास देसाई, रा. बी-१, रुम नं. ३, मानसी पार्क, पेठ गाव, ता. पनवेल ८०२७९६_HK_४३४६३५७९२०२७ | सर्वसाधारण (महिला) | वैध |
| ९ | श्री. दत्तात्रेय जीवराज वाफारे, रा. बी- २०३, सुरभी अपार्टमेंट, से. २१, कामोठे ८०२७९६_HK_२११८११९८४८४५ | सर्वसाधारण | वैध |
| १० | श्रीम. छाया तानाजी मादळे, रा. १०२, स्टार इन्क्लेव्ह सोसायटी, से. २१. कामोठे ८०२७९६_HK_४५०२६७२०७२४३ | सर्वसाधारण (महिला) | वैध |
| ११ | श्री. भिकाजी सुखदेव लोंढरे, रा. फ्लॅट नं. १९, श्री समर्थ सोसायटी, से. १२, खारघर ८०२७९६_HK_६२०४०३८२७५६० | अनूसुचित जाती | वैध |
| १२ | श्री. अनिकेत पांडुरंग थोरात, रा. ई- १. ए १. से. १४. नविन पनवेल ८०२७९६_HK_४३७६४६२४०९६९ | सर्वसाधारण | वैध |
| १३ | श्रीम. मेघा तानाजी नांगरे, रा. ए / ४५ / ६, से. १३, नविन पनवेल ८०२७९६_HK_४१११९७५४३८०७ | सर्वसाधारण (महिला) | वैध |

**प्रत-**
**१. महानगरपालिका यांच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी**
**२. प्रभाग अधिकारी अ, ब, क, ड यांच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी**

**सही/-**
**( शितल स. कुलकर्णी )**
**निवडणूक निर्णय अधिकारी तथा**
**सहाय्यक कामगार आयुक्त, पनवेल**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-13/23-24/ **RFx No. 7000027381** | AMC for regular maintenance work, Outage work and attending emergency breakdown work of 220 kV & 400 kV Transmission Lines under jurisdiction of 400 kV Line Maintenance S/dn, Nagothane under EHV O&M Circle, Panvel... **2nd Call** | Limited to Rs. 25 Lakh | 05.06.2023 up to 23:59 Hrs. |
| 2 | e-Tender-05/23-24/ **RFx No. 7000027517** | Hiring of MMV (i.e. Mahindra Bolero camper or similar) for movement of officers for supervision/official work for Maintenance & Testing Unit under 400 KV R.S. Nagothane Division for 2023-24… **Re-Tender** | Rs 5,99,555/- | 05.06.2023 up to 23:59 Hrs. |

**EMD:** 1% of Estimate Cost & **Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635
e-mail ID: **ee7230@mahatransco.in Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE - E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | **Tender No. & Name of Tender** | **RFx No. 7000027557** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ Re-e-Tender-30/2023-2024. RFx Re-E-Tender for Work of tree cutting work of various 100KV & 220KV Lines under EHV Lines S/Dn., Panvel–1 & 2 for the FY - 2023-24 under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount**: Limited to Rs. 20,00,000/- **EMD:** Rs. 20,000/- |
| 2 | **Online Downloading of the RFx** | 30.05.2023, 18:00 Hrs to 06.06.2023, 23:59 Hrs. |
| 3 | **Online Submission of the RFx** | On or Before 06.06.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | **Online Opening of the Techno-Commercial RFx** | 07.06.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

# पनवेल-सायन महामार्ग उजळला

## महापालिकेच्या माध्यमातून पथदिवे बसवण्याची कार्यवाही

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल सायन महामार्गावरील पथदिवे बंद अवस्थेत आहेत. शासनाच्या आदेशानुसार हे पथदिवे स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात आले आहेत. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने निधी सुद्धा दिलेला आहे. परिणामी महामार्गावरील पारंपारिक पिवळे दिवे काढून त्या ऐवजी एलईडी लावण्याचे काम मनपाने हाती घेतले आहे. त्यामुळे पनवेल मनपा हद्दीतील महामार्गावर लख्ख प्रकाश पडणार आहे.



बांधा वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर पनवेल सायन महामार्गाचे सात वर्षांपूर्वी रुंदीकरण आणि कॉंक्रिटीकरण करण्यात आले. कळंबोली ते बीआरसी जंक्शन यादरम्यान हा महामार्ग आहे. पनवेल टोल वेज कंपनीला हे काम देण्यात आले होते. बाराशे कोटी रुपये खर्च करून हा महामार्ग बांधण्यात आला. त्यावर पथदिव्यांची ही सोय करण्यात आली. त्यामुळे रात्रीच्या वेळी पनवेल-सायन महामार्ग प्रकाशमय झाला. दरम्यान, मध्यंतरीच्या काळामध्ये राज्य सरकारने लहान वाहनांना पथक करांमधून सूट दिली. त्यामध्ये खारघर टोलनाक्याचा ही समावेश आहे. या बदल्यात होणारे नुकसान भरपाई राज्य सरकारने देणे अपेक्षित होते, परंतु मागील सरकारच्या काळात ती रक्कम न मिळाल्याने संबंधित कंपनीने टोल वसुलीचे काम सोडून दिले. त्यानंतर इतर एजन्सी या ठिकाणी नियुक्त करण्यात आली. निधी अभावी महामार्गावरील पथदिवे त्याचबरोबर सिग्नल यंत्रणा देखभाल दुरूस्थ करून ती चालू ठेवणे सार्वजनिक बांधकाम विभागाला दुरापास्त झाले होते.

या सर्व गोष्टींचा विचार करून पनवेल सायन महामार्गावरील पथदिवे देखभाल व दुरुस्तीसाठी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात यावेत अशा प्रकारचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात आले. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नवी मुंबई बरोबरच पनवेल महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार करून हे पथदिवे वर्ग करण्याचे सूचित केले होते. भारती विद्यापीठ ते कळंबोली जंक्शन यादरम्यानचे पथदिवे देखभालीकरिता पनवेल महापालिका देण्यात आले आहेत.

> **अवस्थेत होते. त्यामुळे या मार्गावर रात्रीच्या वेळी पूर्णपणे अंधाराचे जाळे पसरत होते. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला. अखेर पनवेल महापालिकेने जबाबदारी उचलली असून एलईडी दिवे बसवण्याचे काम सुरू आहे. यामुळे हा महामार्ग प्रकाशमय होण्यास सुरुवात झाली आहे. महापालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची भूमिका स्वागतार्ह आहे.**
>
> **-विजया कदम, संस्थापिका, स्त्री शक्ती फाऊंडेशन**

# जुगार अड्ड्यांवर कारवाई करण्याचे पोलिसांसमोर आव्हान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील आदई येथील जुगार चालकाने आपल्या अड्ड्यावर कारवाई होऊ नये म्हणून वेगळीच शक्कल लढविली आहे. कधी डोंगराच्या कडेला, तर कधी झाडी झुडपात अश्या वेगवेगळ्या ठिकाणी अड्डा भरवला जात असून पोलिसांवर नजर ठेवण्यासाठी चक्क दोन मुलांची नेमणूक करण्यात आली आहे. या जुगारात रोज लाखो रुपयांची उलाढाल होते. खांदेश्वर पोलिसांनी अनेक वेळा या जुगार अड्ड्यावर छापा मारण्याचा प्रयत्न केला, परंतु सततच्या जागा बदलल्यामुळे पोलिसांना चकमा देण्यात या जुगार चालकाला यश आले आहे. त्यामुळे या जुगाराच्या अड्ड्यांवर कारवाई करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.



पनवेल परिसरात अनेक जुगाराचे अड्डे बसतात. या जुगार अड्ड्यांवर पोलीस वेळोवेळी कारवाई करतात. परंतु आदई येथील जुगार चालकाने वेगळीच शक्कल लढविली आहे. आपल्या जुगाराच्या अड्ड्यावर कारवाई होवू नये म्हणून वेळोवेळी या जुगार अड्ड्याची जागा बदलली जाते. कधी डोंगराच्या कडेला, तर कधी झाडी झुडपात जुगार अड्डा भरवला जातो. पोलिसांवर नजर ठेवण्यासाठी दोन मुलांची नेमणूक करण्यात आली आहे. या जुगारात रोज लाखो रुपयांची उलाढाल होते. खांदेश्वर पोलिसांनी अनेक वेळा या जुगार अड्ड्यावर छापा मारण्याचा प्रयत्न केला.

परंतु सततच्या जागा बदलल्यामुळे पोलिसांना चकमा देण्यात या जुगार चालकाला यश आले आहे. त्यामुळे या जुगाराच्या अड्ड्यांवर कारवाई करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. त्यामुळे या जुगारावर कारवाई करण्यासाठी पोलिसांना जंग जंग पछाडावे लागणार आहे.

खांदेश्वर पोलिसांना या अड्ड्यावर कारवाई करण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे यात शंका नाही. अनेकजण या जुगारापायी बर्बाद झाले आहेत. अनेकांचे संसार या जुगारामुळे देशोधडीला लागले आहेत आणि त्यामुळेच जुगार हा बेकायदेशीर -ठरविण्यात आला आहे. तरी सुध्दा पनवेल परिसरात अनेक जुगार खुलेआम सुरु आहेत. राज्यात जुगाराला बंदी आहे. अशा जुगार भरविणारे तसेच खेळणारेही शिक्षेस पात्र ठरतात, परंतु या जुगार अड्ड्यांवर होत असलेल्या थातूरमातूर कारवाई केली जाते. ही कारवाई कठोर पध्दतीने होणे गरजेचे आहे.

एखाद्या जुगार अड्यावर कठोर कारवाई झाल्यास अनेक जुगार भरविणाऱ्यांना धडकी बसेल व हे धंदे करताना विचार करावा लागेल. याचा पोलिसांनी गांभिर्याने विचार करावा लागेल.

# सानपाडा येथील रस्त्याचे डांबरीकरण सुरू; नागरिकांमध्ये समाधान



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा सेक्टर ८ मधील एल टाईप असणार्या रस्त्याचे केलेले डांबरीकरण मागील पावसाळ्यात वाहून गेले होते परिणामी, रस्ता गुळगुळीत झाला होता. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले होते सदर रस्त्याचे डांबरीकरण त्वरित करण्यात यावे अशी मागणी शिवसेना परिवहन माजी सदस्य विसाजी लोके यांनी नवी मुंबई मनपा प्रशासनाकडे केली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाने एल टाईप रस्त्याच्या डांबरीकरण करणास सुरुवात केली असल्याने नागरिकांना समाधान व्यक्त केले आहे.

सानपाडा सेक्टर -८ येथील शिवशक्ती, नवप्रेरणा, आदर्श, संकल्प आणि कोहिनूर आदी हाऊसिंग सोसायटीलगतचा एल टाईप असणारा रस्त्याचे केलेले डांबरीकरण मागील पावसाळ्यात वाहून गेले होते. येथील डाबर वाहून गेले होते त्यामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले होते याचा त्रास स्थानिक नागरिकांना आणि वाहन चालकांना होत होता. या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी भाऊ भापकर आणि स्थानिक नागरिकांनी लोके यांच्याकडे केली होती.

नागरिकांच्या समस्या नवी मुंबई मनपा प्रशासनाकडे मांडत येथील रस्त्याचे त्वरित डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी केली होती.

विसाजी लोके याच्या सततच्या पाठपुराव्यामुळे सानपाडा येथील रस्त्याच्या डांबरीकरण करण्यात पालिकेने सुरुवात केली केल्याने नागरिकांनी समाधान व्यक्ती केले आहे.

## ईपीएफओ ग्राहकांसाठी उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या वाशीच्या प्रादेशिक कार्यालयाने सोमवारी (दि. २९) नालंदा एज्युकेशन सोसायटी रेल्वे स्टेशन चेंबूर मुंबईजवळ अंतर्गत पीएफ खातेदार आणि नियोक्ते यांच्या समस्या सोडवण्यासाठी निधी तुमच्या निकट कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते.

या संदर्भात प्रादेशिक कार्यालय वाशी येथे आयोजित निधी आपके निकट-२.० या कार्यक्रमात प्रादेशिक भविष्य निर्वाह निधी आयुक्त-१ जे. पी. चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली, नालंदा एज्युकेशन सोसायटी, चेंबूर मुंबई रेल्वे स्टेशनजवळ. कार्यक्रमादरम्यान सभासदांची उपस्थिती लाभली. नोडल ऑफिसरद्वारे सदस्यांना आणि नियोक्त्यांना निधी आपके नित्त-२.० शी संबंधित माहिती देण्यात आली. या वेळी तेथे आलेल्या सभासद आणि मालकांच्या समस्या ऐकून घेतल्या, त्या सोडवल्या गेल्या आणि निधी आपके निक्स्ट २.०मुळे त्यांच्या तक्रारींचे निराकरण झाल्याचे त्यांच्याकडून पुन्हा सांगण्यात आले.

भविष्य निर्वाह निधी आयुक्त जे. पी. चौहान यांचा संदेश नोडल अधिकाऱ्यांकडून देण्यात आला की, सर्व सभासदांनी त्यांचे पॅनकार्ड, आधार कार्ड आणि बँक तपशील केवायसी स्वरूपात वेळेवर अपडेट करावेत जेणेकरून पैसे भरताना कोणताही त्रास होणार नाही. याशिवाय सभासदांना अत्यंत गरजेच्या वेळीच भविष्य निर्वाह निधीची रक्कम काढण्याचे आवाहन करण्यात आले. सदस्यांनी त्यांना संमती दिली आणि जेव्हा गरज असेल तेव्हाच भविष्य निर्वाह निधीची रक्कम आगाऊ काढू, असे आश्वासन दिले.

## गोठीवलीतील इमारतीवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील घणसोली नोड अंतर्गत असणाऱ्या गोठीवली गावातील पाच मजली अनधिकृत इमारतीवर सिडको आणि मनपाने संयुक्तरित्या कारवाई करीत इमारत पाडली. या वेळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विकासकाने ही इमारत बांधताना कुठलीही परवानगी घेतली नाही. तसेच सिडको हस्तांतरण झालेल्या जमिनीवर ही इमारत बांधण्यात आलेली होती.

या बाबत सबंधित लोकांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या मात्र त्याकडे दुर्लक्ष करून बांधकाम सुरूच ठेवण्यात आले होते. त्यामुळे सिडको आणि नवी मुंबई मनपाने संयुक्त रित्या केलेल्या या कारवाईत इमारतीचा मोठा भाग पाडण्यात आला. हि कारवाई दिवसभर सुरू होती. या कामात अडथळा येऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्तही तैनात ठेवण्यात आला होता. या वेळी सिडको आणि मनपाचे अतिक्रमण विरोधी विभागाचे अधिकारी, पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एपीएमसी परिसरातील फळ मार्केटसह आय.सी.एल. शाळा आणि अन्य गर्दीच्या बस थांब्यांवर वाहने पार्क करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर एपीएमसी वाहतूक पोलीस शाखेद्वारे कारवाईचा बडगा उगारण्यात आला. या विशेष मोहिमेत ५०हून अधिक वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली.



शहरातील अनेक ठिकाणचे रस्ते अरुंद आहेत. शहरात बस थांब्यांच्या दोन्ही बाजूस १५ मीटर पर्यंतच्या अंतरावर बस व्यतिरिक्त कोणतीही वाहने उभी करू नये, असा नियम आहे. या संदर्भात अनेक बस थांब्या जवळ नो पार्किंगचे फलकही महापालिका आणि वाहतूक पोलीस यांच्या माध्यमातून लावण्यात आले आहे. तरीदेखील बेशिस्त वाहनचालक बस थांब्या जवळ गाड्या उभ्या करून प्रवाशांना बसमध्ये चढण्यासाठी अडथळा निर्माण करत असतात. यात आणखी भरीसभर म्हणून रिक्षावाल्यांची बस थांब्यावरील प्रवासी घेण्यासाठी नेहमीच स्पर्धा लागलेली असते. यामुळे बस आली की वाहतूक कोंडी झालीच समजा.

संपूर्ण शहरात ही समस्या गर्दीच्या बस थांब्यावर दिसून येते. याची पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी नोंद घेतली. त्यांनी बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार नुकतीच एपीएमसी वाहतूक पोलीस शाखेच्या माध्यमातून या विषयी विशेष मोहिम राबवण्यात आली. स्टेट बँक ऑफ इंडिया, विहांग होंडा, फ्रुट मार्केट आणि इतर बस स्टॉप जवळ गस्तीदरम्यान पार्क असणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. तसेच सतरा प्लाझा या ठिकाणी पार्किंगचे नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई केली. बस थांब्याजवळ वाहने पार्क करून प्रवाशांना आणि वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यांवर यापुढेही कारवाई चालू ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करून पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन एपीएमसी वाहतूक पोलीस शाखेच्या पोलीस निरीक्षक विमल बिडवे यांनी केले आहे.

## ४२४ लघुउद्योजकांना कर भरण्यासाठी नोटीस

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या मालमत्ता कर भरण्यास नकार देणाऱ्या ४२४ लघुउद्योजकांना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कर भरण्यासाठी नोटीसा बजावण्यास प्रारंभ केला आहे, अशी माहिती नवी मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी दिली.

यातील अनेक उद्योजकांनी अगदी महापालिकेच्या स्थापनेपासून मालमत्ता कर भरला नाही. या थकबाकीदारांकडून अनुमाने १५० कोटी रुपयांहून अधिक रक्कम महापालिकेला प्राप्त होणार आहे. बेलापूर पट्टीतील लघुउद्योजकांनी आपण औद्योगिक क्षेत्रात असल्याने महापालिकेने लागू केलेला मालमत्ता कर भरणार नसल्याचे सांगत आंदोलन केले. सर्वोच्च न्यायालयापर्यंत हे प्रकरण गेले. अखेर मागील महिन्यात न्यायालयाने सर्व थकबाकीदार लघुउद्योजकांनी मालमत्ता कर भरला नाही, तर पुढील सुनावणी घेणार नाही, असे स्पष्ट केले. तसेच कर वसुलीसाठी त्यांच्या मालमत्ता सील करण्याचेही आदेश दिले. महापालिका क्षेत्रात अनुमाने ४२४ लघुउद्योजक कर भरत नव्हते. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार लघुउद्योजकांनी कराचा भरणा करून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन सुजाता ढोले यांनी केले आहे.

## सोलर प्रकल्पाला गृहनिर्माण संस्थांचा प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार,**
**पनवेल : प्रतिनिधी**

राज्यातील विविध सहकारी गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या इमारतींवर रूफ टॉप सोलर प्रकल्प बसविल्याने सोसायटीच्या वीजबिलात मोठी कपात झाली आहे. राज्यात ३,०२६ हाऊसिंग सोसायट्यांनी ५२ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता गाठली असून आपले हजारो रुपये वीज बील वाचवले आहे. त्यामुळे अधिकाधिक संस्थांनी छतावरील सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवावेत, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले आहे.



रूफ टॉप सोलरमुळे सोसायटीच्या छतावर निर्माण झालेली वीज सोसायटीतील लिफ्ट, पाण्याचे पंप तसेच इमारतीतील जिने व पार्किंग येथील सार्वजनिक दिवे इत्यादी कामांसाठी वापरली जाते. सोसायटीच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पामध्ये गरजेपेक्षा जास्त वीज निर्माण झाली तर ती महावितरणला दिली जाते व त्याची नोंद नेट मिटरिंगद्वारे ठेवली जाते. सौर ऊर्जा निर्मितीपेक्षा जर अधिक विजेची गरज पडली तर ती महावितरणकडून घेतली जाते. महावितरणला सोसायटीकडून मिळणाऱ्या विजेच्या बदल्यात सोसायटीच्या वीजबिलात कपात होते, अशी माहितीही सिंघल यांनी दिली.

महावितरणच्या www.mahadiscom.in/ismart या संकेतस्थळावर याची संपूर्ण माहिती देण्यात असून ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची सुविधा आहे. गृहनिर्माण संस्थांना ५०० किलोवॅट क्षमतेपर्यंतच्या छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी २० टक्के अनुदान मिळते. सौर ऊर्जानिर्मितीसाठी वापरलेले पॅनेल्स, वायर्सची गरज, पॅनेल्स बसविण्याच्या स्थानाची स्थिती इत्यादीनुसार खर्चात फरक पडतो. नोंदणी असलेल्या एजन्सीमार्फत प्रकल्प बसविले जातात. महावितरण प्रकल्पाच्या मंजुरीपासून तपासणी व अंतिम मंजुरीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर मदत करते, अशी माहिती त्यांनी दिली.

### वीजबिलात मोठी कपात

*ठाण्यातील एका गृहनिर्माण संस्थेने ९० किलो वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यानंतर त्यांचे दीड लाखाचे वीजबिल ७१ हजारांवर आले. ठाण्यातीलच आणखी एका हाऊसिंग सोसायटीने ८० किलो वॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यानंतर त्यांचे विजेचे बिल एक लाख ४८ हजारांवरून ६६ हजारांवर आले. भांडूपच्या एका गृहनिर्माण संस्थेने ४० किलो वॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यानंतर त्यांचे एक लाख २० हजार रुपयांचे वीजबिल ३८ हजारांवर आले.*




## निवडक

### म्हसळ्यात स्वा. सावरकर जयंती

**म्हसळा** : सार्वजनिक वाचनालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची १४०वी जयंती रविवारी (दि. २८) उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त सावरकरांच्या जीवनावर आधारित पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले.



कार्यक्रमाला अध्यक्ष संजय केशव खांबेटे, शिवसेनेचे उपतालुका प्रमुख प्रवीण बनकर, दिपक जोशी, चिखलपचे बुवा दिलीप शिंदे, ग्रंथपाल उदय करडे आणि अन्य वाचक उपस्थित होते. या वेळी सावरकर वाद, समग्र सावरकर वाङ्मयचे अनेक खंड, भारत मातेचा वीर पुत्र, स्वातंत्र्यवीर सावरकर चारित्र आणि कार्य स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, सावरकर –आंबेडकर यांचे विचार समिक्षा आणि अन्य विविध पुस्तके प्रदर्शनात होती.

### प्रभारी तहसीलदार देसाईंना निरोप



**पोलादपूर** : तालुक्यातील निवासी नायब तहसीलदार समीर देसाई यांची चिपळूण येथे प्रशासकीय बदली झाली असून त्यांनी सोमवारी (दि. २९) पदाचा कार्यभार स्वीकारला. समीर देसाई यांची बदली झाल्याचे कळताच तहसील कार्यालयातील कर्मचारी सहकाऱ्यांनी त्यांना निरोप दिला. या वेळी परिविक्षाधिन तहसीलदार पूनम कदम व विनायक घुमरे, अव्वल कारकून मंगेश ढेबे, शहाजी भुजबळ, राहुल ससाणे व उमेश चांदोरकर, मंडळ अधिकारी सुरेश राठोड आणि फुलचंद राठोड, महसूल सहाय्यक सिध्देश दवंडे, प्रशांत अंबिलकर, परशराम पाटील तसेच तलाठी योगेश वारडे आणि शिपाई पुजारी आदी उपस्थित होते.

### महेंद्र गुजर यांचा पुरस्काराने सन्मान



**रोहे** : रोहे शहराला दिलेल्या सामाजिक सेवेबद्दल महाराष्ट्र जर्नालिस्ट फाउंडेशनतर्फे महेंद्र गुजर यांना द प्राईड ऑफ इंडिया भास्कर अवॉर्डने रविवारी (दि. २८) गोवा येथे सन्मानित करण्यात आले. या वेळी गोवा राज्य पत्रकार युनियन अध्यक्ष राजतीलक नाईक, कामगार नेते ॲड. अजितसिंग राणे, ॲड. धैर्यशील पाटील, संस्थाध्यक्ष राजीव लोहार आदी उपस्थित होते. रोहा शहरातील सामाजिक, सांस्कृतिक राजकीय क्षेत्रात महेंद्र गुजर हे नेहमी हिरीरीने सहभागी होत असतात. महेंद्र गुजर यांना पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.


# पाणी पातळी घटल्याने माणगावात टंचाई

## जॅकवेल पडले कोरडे; एक दिवसाआड जलपुरवठा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या जॅकवेलजवळ काळ नदीतील पाण्याची पातळी घसरल्याने माणगावला भीषण पाणीटंचाईशी सामना करावा लागत आहे. प्रचंड उष्णतेमुळे यंदाचे वर्षी नदीतील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावत आहे. त्यामुळे नगरपंचायतीने एक दिवस आड करून पाणीपुरवठा करण्याचे ठरविले आहे.

माणगाव नगरपंचायतीत सन २०११च्या जनगणनेनुसार १९ हजार लोकसंख्या आहे. १७ प्रभाग येत असून भादाव, जुने माणगाव, खांदाड, नाणोरे, उतेखोल, उतेखोलवाडी, दत्तनगर, साईनगर, क्रांतीनगर, आदर्श समतानगर, विरेश्वर नगर, विद्या नगर, बामणोली रोड, सिद्धी नगर, सुतारआळी, ढालघरफाटा, बाजारपेठ, मोर्बा रोड अशा विविध भागात १० लाईनद्वारे नगरपंचायतीकडून पाणीपुरवठा केला जातो. सध्या काळ नदीवरील पाण्याची पातळी आटल्याने एक दिवस पाणीपुरवठा नगरपंचायतीकडून केला जात आहे.



उतेखोल भागात काळ नदीवर जॅकवेल १९७२ साली माणगाव ग्रामपंचायतीचे सरपंच स्व. अशोक साबळे हे सरपंच असताना बसवले होते. त्या वेळी ही योजना जीवन प्राधिकरणकडे होती. त्यानंतर माणगाव ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आली. त्यात वेळोवेळी सुधारणा करीत ही योजना वाढत्या लोकसंख्येनुसार कार्यान्वित करण्यात आली. २०१५मध्ये ती माणगाव नगरपंचायतीचे ताब्यात आली.

एक दिवस आड करून नागरिकांना पाणी नगरपंचायतीने सोडण्याचा निर्णय घेतला असून अनेक भागात हे पाणी कमी दाबाने तर काही भागात कमीच पाणी पडत आहे. त्यातच अनेक नागरिक नळाला पंप बसवून पाणी खेचत आहेत. त्यामुळे पाणी पातळी मोठ्या प्रमाणात घटल्याने नागरिकांना या पाणी समस्येला तोंड द्यावे लागणार आहे.

**खांदाड परिसरात जॅकवेलची मागणी**

**खांदाड परिसरात काळ नदीचे पाणी कधीच आटत नाही. त्या ठिकाणी जॅकवेल उभारल्यास माणगावचा कायमचा पाणी प्रश्न सुटेल, अशी नागरिकांतून आशा व्यक्त होत आहे. माणगाव नगर पंचायतीने पाटबंधारे विभागाकडे कालव्याला पाणी सोडण्याची मागणी केली असून हे पाणी कधी सुटणार हा प्रश्न अनुत्तरीत राहणार आहे.**

## भरधाव वेगाने तीन तरुणांचा करुण अंत

**नागोठणे : प्रतिनिधी, बातमीदार**

नागोठणेनजीक वाकण–पाली मार्गावर गोडसई हद्दीत भरधाव वेगात जाणाऱ्या दुचाकीच्या अपघातात तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात सोमवारी (दि. २९) पहाटे ३.१५ वाजण्याच्या सुमारास घडला. ओमकार देशमुख (वय २०, रा. सुधागड), ऋषिकेश लोखंडे (वय २४, रा. कल्याण) आणि यश चव्हाण (वय २१ रा. पालघर) अशी या अपघातात मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत.

ओमकार देशमुख याच्या भावाच्या हळदी समारंभाकरिता त्याचे मित्र ऋषिकेश व यश हे पाली येथे आले होते. दोघे डिप्लोमा कोर्स करीत होते, तर ऋषिकेश पुणे येथे नोकरीस होता. ओमकार देशमुख हा



त्याच्या वडिलांचा एकुलता एक मुलगा असल्याचीही प्राथमिक माहिती समोर आली आहे.

ते तिघे एकाच गाडीवर बसून ट्रीपल सीट प्रवास करीत होते. त्यांची भरधाव वेगात असलेली दुचाकी वजरोली गाव हद्दीतील जंगली पिर दर्ग्याजवळ आली असता, अवघड वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले, त्यामुळेच हा भीषण अपघात झाला. ज्यामध्ये तीनही तरुणांना जीव गमवावा लागला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

## खालापुरात आज समाधान शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत खालापूर तालुक्यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समस्या समाधान शिबिराचे आयोजन बुधवारी (दि. ३१) तहसील कार्यालयाच्या आवारात नेताजी पालकर सभागृह येथे करण्यात आले आहे.

या शिबिरास विधीसेवा प्राधिकरण, महावितरण, पंचायत समिती अंतर्गत येणारे सर्व विभाग, पोलीस विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, महिला व बालविकास विभाग, महसूल विभाग, पाणीपुरवठा व स्वछता विभाग आदी सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी महिलांना शासनाच्या सर्व योजनांची माहिती व त्यांच्या समस्याचे निराकरण करणार आहेत.

## मुरूड समुद्रकिनाऱ्यालगत अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड समुद्रकिनारालगत असणाऱ्या रस्त्यावर टपरीधारक व इतर दुकानदारांनी रस्ता अडवून व्यवसाय थाटल्याने त्यांच्यावर पोलीस व नगर परिषदेने धडक कारवाई केली.

या वेळी पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ, हवालदार संतोष गायकवाड, नाईक किशोर बठारे, आरती पवार, सागर रसाळ, नगर परिषदेचे मुकादम अभिजित चांदोरकर, सचिन कोरके, विनायक तळेकर आदींसह कर्मचारी या मोहिमेवेळी उपस्थित होते.

मुरूड हा पर्यटनस्थळ असून ररोज शेकडो पर्यटक समुद्रकिनारी ये–जा करित असतात. त्याबरोबर स्थानिक ही येत असतात, परंतु काही व्यावसायिकांनी आपली दुकाने



रस्त्यावरच मांडल्यामुळे वाहतूक कोंडी होत होती. अनेकदा भांडणाचेही प्रंग उद्‌भवले. यामुळेच पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांनी रस्त्यात व्यवसाय करणाऱ्या २५ जणांवर कारवाई केली. या कारवाईने रस्त्यानेही मोकळा श्वास घेतला. या कारवाईचे सर्वच स्तरांतून स्वागत केले आहे.

पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ यांनी सांगितले की, पर्यटन क्षेत्राच्या रस्ता अडवून व्यवसाय करणाऱ्यांमुळे रहदारीला अडथळा होत होता. गाडी लावण्यावरून भांडणे पोलीस ठाण्यातपर्यंत येत होती. याची दखल घ्यावी लागली. यापुढेही कारवाई सुरू राहणार आहे.

## मच्छीमार बांधवांच्या समस्या सोडण्यासाठी प्रयत्नशील –संदीप पाटील

**पाली : प्रतिनिधी**

कोकण किनारी, किनाऱ्यावर पिढीजात मच्छिमारी व्यवसाय करणारा बांधव आज अडचणींचा सामना करीत आहे. मच्छिमार बांधवांच्या अडीअडचणी व समस्या सोडवून त्यांना शासन योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कोकण किनारा मच्छिमार संघटना प्रयत्नशील राहणार असल्याचे संदीप पाटील यांनी सांगितले.

त्याचप्रमाणे कोकण किनारा मच्छिमार संघटना स्थापना सोहळा मंगळवारी (दि. ६) एमपी हॉल, जेएनपीए (टाऊनशीप) उरण या ठिकाणी होणार आहे, असे भूषण पाटील यांनी सांगितले.

कोकण किनारा मच्छिमार संघटना स्थापना सोहळ्यास प्रसिद्धी पत्रकाद्वारे मासेमारी व्यवसायासमोरील समस्या व आव्हाने मांडण्यात आली असून यासंदर्भात गावोगावी घरोघरी जाऊन पत्रकाद्वारे जनजागृती केली जात आहे. या समस्या सोडविण्यासाठी देश पातळीवरील सेंटर ऑफ इंडियन ट्रेंड युनियन (सीआयटीयू) या सर्वांत मोठ्या कामगार संघटनेसोबत संलग्न असलेली ऑल इंडिया फिशर्स ॲण्ड फिशरीज वर्कर्स फेडरेशन मच्छिमारांसाठी काम करीत आहे. त्याच संघटनेला संलग्न होऊन आपण कोकण किनारा मच्छिमार संघटना स्थापन करीत आहोत. आम्हाला खात्री आहे.

सर्व सामान्य आणि मच्छिमार कामगार कर्मचारी यांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या कोकण किनारा मच्छिमार संघटनेचे सदस्यत्व स्वीकारून आपल्या समस्या आपणच एकजुटीने व प्रामाणिकपणे सोडवूया, असे संदीप पाटील यांनी सांगितले.




## मुरूड आगारात दोन नवीन एसटी बस दाखल



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड आगारात बहुतांशी जुन्या बसेस असल्याने देखभाल करूनही गाड्या बंद पडल्याचे प्रकार घडल्याने सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर यांनी विभाग नियंत्रकांकडे नवीन बसेसची मागणी केली होती. त्यावर विभागीय नियंत्रकांनी नवीन बसच्या मागणीचा प्रस्ताव सादर केल्यानंतर सोमवारी (दि. २९) दोन नवीन एसटी बस आगारात दाखल झाल्याने आनंद व्यक्त होत आहे.

नवीन बसेस विषयी आगार व्यवस्थापक नीता जगताप यांना विचारले असता त्या म्हणाल्या की, दोन नवीन बसेस सोमवरापासून पहाटे ४.४५ वाजताची मुरूड–डोंगरी तर सकाळी ६.३० वा. ची मुरूड–मुंबई (साळाव–रोहामार्गे) सोडण्यात आल्या आहेत.

## नवनियुक्त उपविभागीय पोलिसांचे स्वागत

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यासाठी नवनियुक्त उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांची नेमणूक झाली असून, त्यांची त्यांच्या कार्यालयात खालापूर पोलीस पाटील संघटनेने सदिच्छा भेट घेतली.

उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला यांची मुंबई येथे बदली झाल्याने त्यांच्या जागेवर विक्रम कदम यांची नियुक्ती झाली आहे. तालुका पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे यांनी सदिच्छा भेट घेतली व त्यांचे स्वागत केले. या वेळी संघटनेचे उपाध्यक्ष अनंत मलबारी, पोलीस पाटील कमलाकर पाटील, कृष्णकांत दळवी उपस्थित होते.पोलीस पाटलांना सहकार्य करण्याचे आश्वासन पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी दिले.

## अलिबागमध्ये भक्तीरस कार्यक्रम उत्साहात

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या सहयोगाने स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीचे औचित्य साधून सावी फाउंडेशन निर्मित महाराष्ट्रातील थोर संतांचे कार्य अजरामर अभंगांमधून निरूपणासह उलगडून दाखविणाऱ्या भक्तीरंग कार्यक्रमाचे आयोजन भाग्यलक्ष्मी सभागृहात करण्यात आले.

भक्तीरंग कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी अलिबागमधील विविध



क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. भक्तीरंग कार्यक्रमाची सुरुवात आदर्श पतसंस्थेचे चेअरमन सुरेश पाटील, अभिजित पाटील यांनी दीपप्रज्वलनाने केली. या वेळी त्यांच्यासमवेत रघुजीराजे आंग्रे, जगदीश पाटील, द्वारकानाथ नाईक, रमेश नाईक, रमेश धनावडे, डॉ. उदय जोशी, ॲड. जयंत चेऊलकर, प्रदीप नाईक, ॲड. सचिन जोशी, डॉ. विशाखा मोडक आदी उपस्थित होते. या वेळी संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे संजय कवळे आणि यशस्वी महिला उद्योजक स्वप्नाली घरत यांचा सावी फाऊंडेशनच्या माध्यमातून सन्मान करण्यात आला.

अलिबागमधील गायक मंदार भिडे, गायिका कस्तुरी देशपांडे, श्रुती बुजरबरुआ आणि प्रसिद्ध निवेदक, मुलाखतकार हेमंत बर्वे यांची त्यांना लाभलेली साथ अशा या बहारदार भक्तीसंगीताची मैफील ऐकण्यासाठी रसिक श्रोत्यांनी गर्दी केली होती.

# कर्जतच्या ‘अभिनव’मध्ये सुवर्णमहोत्सवी स्नेहसंमेलन



## पन्नास वर्षांनी वर्गमित्रांची ओळख परेड

**या स्नेहसंमेलनासाठी नाशिक, पुणे, बोरिवली, ठाणेपासून, चौक, खोपोली, कल्याण, पनवेल, नवी मुंबई येथून वर्गमित्र आले होते. १९७३नंतर पुन्हा ४० जण एकत्र येणे यात एक वेगळाच आनंद होता. सर्वांची नव्याने ओळख परेड झाल्यानंतर एकमेकांची फिरकी घेण्यात कसा वेळ गेला ते कळलेच नाही.**

**कर्जत : प्रतिनिधी**

येथील अभिनव ज्ञानमंदिर प्रशालेच्या १९७३च्या जुन्या अकरावीतील विद्यार्थ्यांनी दोन दिवस सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. यातील काहीजण ५० वर्षांनंतर भेटत होते.

दिवसभर गप्पाटप्पा, नाच, गाण्यांच्या भेंड्या असा भरगच्च कार्यक्रम होता. मीना आफळे व मंगल जोशी या भगिनींनी प्रत्येकाच्या हाताला अत्तर लावून मैत्रीचा सुगंध पसरवित उपस्थित वर्गमित्रांचे स्वागत केले. त्यानंतर कर्जतचे सुप्रसिद्ध गरमागरम वडे व सामोसे यांचा आस्वाद घेत गळाभेटी होऊन हास्याचे फवारे उडण्यास सुरवात झाली. यापुढे किमान वर्षातून एकदा तरी परत भेटायचेच अशा वचनांची देवाणघेवाण झाली आणि 'असेच भेटत राहू' असा शब्द देऊन सर्वांनी साश्रुनयनाने निरोप घेतला.

या संमेलनाला चंपालाल ओसवाल, सुधीर पोतदार, अनंता देवळे, मारुती बैलमारे, रमण गांगल, रेखा देशपांडे, सुवर्णा देशमुख, रोहिणी ढगे, माधुरी गडकरी, मीना आफळे, विजया तळवलकर, रमीला शहा, माधुरी मोडक, रोहिणी धामणकर, नंदू नेर्लेकर, अरुणा परांजपे, रजनी जोशी, मंगल जोशी, जया पवार, शुभदा गडकरी, ज्योती बागुल, शशी फाटक, प्रकाश काळे, रमण गांगल, प्रकाश परमार, रमेश काळण, सुहास जोशी, विश्वास बोराडे, विनायक गुरव, अरविंद शिंपी, गोपाळ शेळके, सुधाकर देशमुख, मिलिंद मेढी, संजू मुळे, विजू गुप्ता, गणपत दगडे, अविनाश देशमुख आदी उपस्थित होते.



**कर्जत : सेजल जयंद्रथ मसणे (रा. आंबोट) हिने बारावी वाणिज्य शाखेत ९० टक्के गुण मिळवून अभिनव कॉलेज आणि तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल पोटल ग्रामपंचायतीच्या सरपंच मीरा मसणे, बोरिवली ग्रामपंचायत माजी सदस्य कल्पना मिणमिणे, युवा नेते मिनेश मसणे यांनी सत्कार केला आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# चेन्नईचा विजेतेपदाचा ‘पंच’

## रवींद्र जडेजा ठरला हिरो!


आयपीएल चषकावर पाचव्यांदा कोरले नाव

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या अंतिम सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने गतविजेत्या गुजरात टायटन्सला पराभूत करीत पाचव्यांदा चषक उंचावला. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २० षटकांत ४ गडी गमावून २१४ धावा केल्या होत्या. यानंतर पावसामुळे डकवर्थ लुईस नियमानुसार चेन्नईला १५ षटकांत १७१ धावांचे लक्ष्य मिळाले. रवींद्र जडेजाने मोहित शर्माच्या शेवटच्या षटकातील दोन चेंडूंवर षटकार आणि चौकार मारत रोमहर्षक विजय मिळवला.

पावसाच्या व्यत्ययामुळे रात्री उशिरापर्यंत झालेल्या या सामन्यात चेन्नईने विजय मिळवत आयपीएल इतिहासात पाच वेळा चॅम्पियन ठरणारा दुसरा संघ ठरला आहे. गुजरातला सलग दुसऱ्या आयपीएल हंगामात विजेतेपद राखता आले नाही. सीएसकेच्या आघाडीच्या फलंदाजांनी सुरुवात दणक्यात करून दिली, परंतु गुजरातचे हुकमी एक्के नूर अहमद व मोहित शर्मा यांनी मॅच फिरवली होती. अखेर रवींद्र जडेजाने शेवटच्या दोन चेंडूंत १० धावा चोपून विजय मिळवून दिला.

पावसामुळे षटके कमी झाली आणि चेन्नईला १५ षटकांत १७१ धावांचे लक्ष्य होते. चेन्नईकडून कॉनवेने सर्वाधिक ४७ धावा केल्या. शिवाय सर्व फलंदाजांनी चांगले योगदान दिले.

तत्पूर्वी, कोलकाताकडून शुबमन गिल व ऋद्धिमान साहा या जोडीने पुन्हा एकदा अर्धशतकी सलामी दिली. गिलने ३९, तर साहाने ५४ धावांचे योगदान दिले. गुजरातच्या डावाचा नायक साई सुदर्शन ठरला. त्याने ४७ चेंडूंत ९६ धावांची शानदार खेळी केली. कर्णधार हार्दिक पांड्या २१ धावा करून नाबाद राहिला.

# आदर्श इलेव्हन संघ साई प्रीमियर लीगचा मानकरी

**उरण : वार्ताहर**

गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचा लाभ व्हावा यासाठी आवरे येथे साईनगर प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम सामन्यात आदर्श इलेव्हन संघाने साची इलेव्हन संघाचा पराभव करीत विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत आयपीएलच्या धर्तीवर संघांची विभागणी करण्यात आली होती. राऊंड रॉबिन पद्धतीने साखळी सामने खेळण्यात आले होते. आमदार महेश बालदी यांच्या सौजन्याने स्पर्धेसाठी टी-शर्टची व्यवस्था करण्यात आली होती.

मालिकावीर समीर गावंड, उत्कृष्ट फलंदाज सिद्धेश भगत, उत्कृष्ट गोलंदाज श्रेयस ठाकूर, क्षेत्ररक्षक शत्रुघ्न पाटील, तर उदयोन्मुख खेळाडू म्हणून आर्य गावंड याची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.



# खालापुरातील कराटेपटूंचे सुयश

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

मुलूंड येथे झालेल्या राष्ट्रीय खासदार चषक भव्य कराटे स्पर्धेत खालापुरातील डॉ. देव मार्शल आर्ट अकॅडमीचे सुयश प्राप्त केले. या अकॅडमीच्या चार खेळाडूंनी पदके जिंकली.


शोतोकान प्रकारात सिया प्रदीप बैलमारे हिने सुवर्णपदक, तर साक्षी सुरेश धारणे, रुद्धवी राजेश निगडे व शिवम संतोष शर्मा यांनी कास्यपदकाची कमाई केली. सर्व खेळाडूंना प्रशिक्षक नितीन बोंदार्डे यांचे मार्गदर्शन मिळाले. संस्थेचे मुख्य प्रशिक्षक डॉ. महादेव शिंदे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com